# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ५ वे अंक ३५ बुधवार दि.०६ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## तुकाराम मुंढेंची पुन्हा बदली, २० वर्षात २३ वेळा ट्रान्सफर; महत्वाच्या खात्यावर सचिव म्हणून नियुक्त




राज्यातील धडाडीचे आयएएस अधिकारी अशी ओळख असलेल्या तुकाराम मुंढेंची (ख-ड ढळझरीरा चींपवश) पुन्हा एकदा बदली करण्यात आली आहे. २० वर्षांच्या सेवेत मुंढेंची २३ साव्यांदा बदली करण्यात आली आहे.

नव्याने बदली करण्यात आल्यानंतर आता मुंढेंची दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे नियुक्ती करण्यात आली आहे. मुंढे यांच्यासह राज्यातील पाच वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्याही (ख-ड जषषळलशी) बदल्या करण्यात आली आहे.

धनुभाऊंची कमबॅक करण्याची तारीख ठरली?; सतेज पाटलांनी गुगली टाकत फोडली नवी चर्चा

कोणत्या अधिकाऱ्याची बदली कुठे?

१. तुकाराम मुंढे (आयएएस: आरआर: २००५) विकास आयुक्त (असंघटित कामगार), मुंबई यांना सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

२. नितीन काशीनाथ पाटील (आयएएस: एससीएस: २००७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ, मुंबई यांना विशेष आयुक्त, राज्य कर, महाराष्ट्र, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

३. अभय महाजन (आयएएस: नॉन-एससीएस: २००७) विशेष आयुक्त, राज्य कर, महाराष्ट्र, मुंबई यांना व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

४. ओंकार पवार (आयएएस: आरआर: २०२२) सहाय्यक जिल्हाधिकारी, इगतपुरी उपविभाग, नाशिक यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

५. आशा अफजल खान पठाण - सहसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूर यांना महासंचालक, वनमती, नागपूर म्हणून नियुक्त करण्यात आले आहे आणि त्यांना सहसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूरचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

राज्य सरकार चालवणार 'छावा राईड'; परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची मोठी घोषणा

तुकाराम मुंढेंची आतापर्यंत झालेली बदली आणि खाती (२००५-२०२५ पर्यंत)

१. ऑगस्ट २००५ - प्रशिक्षणार्थी, उपजिल्हाधिकारी, सोलापूर
२. सप्टेंबर २००७ - उपजिल्हाधिकारी, देगलूर उपविभाग
३. जानेवारी २००८ - सीईओ, जिल्हा परिषद, नागपूर
४. मार्च २००९ - आयुक्त, आदिवासी विभाग
५. जुलै २००९ - सीईओ, वाशिम
६. जून २०१० - सीईओ, कल्याण
७. जून २०११ - जिल्हाधिकारी, जालना
८. सप्टेंबर २०१२ - सहा आयुक्त विक्रीकर, मुंबई
९. नोव्हेंबर २०१४ - जिल्हाधिकारी, सोलापूर
१०. मे २०१६ - आयुक्त, नवी मुंबई
११. मार्च २०१७ - मुख्य कार्यकारी अधिकारी, पीएमपीएल, पुणे
१२. फेब्रुवारी २०१८ - आयुक्त, नाशिक महापालिका
१३. नोव्हेंबर २०१८ - सहसचिव, नियोजन
१४. डिसेंबर २०१८ - प्रकल्प अधिकारी, एड्स नियंत्रण, मुंबई
१५. जानेवारी २०२० - आयुक्त, नागपूर महापालिका
१६. ऑगस्ट २०२० - सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१७. जानेवारी २०२१ - राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, भारत
१८. सप्टेंबर २०२२ - आयुक्त, आरोग्य सेवा आणि संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान (छक्च्)
१९. नोव्हेंबर २०२२ - अचानक बदली, प्रतीक्षेत ठेवण्यात आले (छक्च् चा कार्यकाल फक्त २ महिने)
२०. एप्रिल २०२३ - सचिव, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभाग
२१. जून २, २०२३ - सचिव, मराठी भाषा विभाग
२२. जुलै २०२३ - कृषी आणि पशुसंवर्धन विभाग सचिव म्हणून बदली पुढे चालू राहिली.
२३. ऑगस्ट २०२५ - ५ ऑगस्ट २०२५ रोजी मुंढें यांची २३ व्यांदा बदली करण्यात आली असून त्यांना आता दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत.

## शिवसेनेचा बाप मीच; परिणय फुकेंच्या विधानामुळे महायुतीत वादाची ठिणगी? फडणवीसांनी स्पष्ट शब्दात सांगितले



भाजप आमदार परिणय फुके यांनी पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्यात 'मीच शिवसेनेचा बाप' असं विधान केले आहे. फुके यांच्या या विधानानंतर भाजप आणि शिवसेना हे एकमेकांविरुद्ध उभे ठाकल्याचे चित्र बघायला मिळत आहे. यावरून आता शिंदे गटाचे नेते संजय कुंभलकर यांनी परिणय फुकेंनी १२ तासांच्या आत जाहीर माफी मागावी अन्यथा आम्ही त्यांना शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ, असा इशारा दिला आहे.


परिणय फुके म्हणाले की, काही लोकांनी माझ्यावर आरोप केले. मी कुठल्याही आरोपाला उत्तर देत नाही. परंतु त्यादिवशी माझ्या चांगले लक्षात आले, जर एखादा मुलगा परीक्षेत चांगले मार्क्स मिळवत असेल तर त्याची नाहीतर आईचं कौतुक केले जाते. काही चांगले झाले तर आईने केले किंवा त्या मुलाने केले. याउलट जर काही वाईट झाले तर दोष बापावर केला जातो. त्यामुळे मला पक्कं माहिती झालं, शिवसेनेचा बाप मीच आहे. खापर माझ्यावर फोडले जाते. या सगळ्या आरोपांकडे लक्ष न देता आपण आपलं काम ताकदीने सुरु ठेवलं पाहिजे आणि पक्ष वाढवण्याचं काम केलं पाहिजे, असे त्यांनी म्हटले.

शिवसेनेचा परिणय फुकेंना इशारा यावर शिंदे गटाचे लोकसभा प्रमुख संजय कुंभलकर म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे हे शिवसेनेचे पिता आहेत. कुणीही आमचा बाप होण्याचा प्रयत्न करू नका. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत परिणय फुके यांनी शिवसेना उमेदवार प्रकाश मालगावे यांना हरवण्याचे काम केले. त्यांनीच काँग्रेसच्या उमेदवाराला सहा मते देण्याचा डाव खेळला. त्यामुळे सेनेच्या उमेदवाराला पराभवाचा सामना करावा लागला.

आता फुके यांनी शिवसेनेबद्दल अपमानकारक शब्दाचा वापर केल्याने कार्यकर्त्यांचे मन दुखावले गेले आहे. परिणय फुकेंनी १२ तासांच्या आत जाहीर माफी मागावी अन्यथा आम्ही त्यांना शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा नेत्याला आवरावे, अन्यथा शिवसेनेचा बाप कोण आहे हे आम्ही सांगू, असा इशारा त्यांनी दिला. देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांचे कान टोचले

परिणय फुके यांच्या विधानाबाबत देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. हे वक्तव्य पूर्ण पार्श्वभूमीवर बघितलं, तर तसं बोललं पाहिजे, नाही बोललं पाहिजे हा त्यांचा विषय आहे. पण पूर्ण पार्श्वभूमीवर बघितलं तर शिवसेनेचा मी बाप आहे, असा त्याचा अर्थ कुठेही होत नाही. त्यामुळे अर्थवट वाक्ये कापायची आणि ती चालवायची हे बंद केलं पाहिजे, अशा शब्दात देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांचे कान टोचले.

## भाजपाच्या प्रवक्त्यांची थेट न्यायाधीश म्हणून नेमणूक, विरोधक आक्रमक!



राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाचे आमदार रोहित पवार गेल्या काही दिवसांत चांगलेच चर्चेत आहेत. त्यांनी सत्ताधारी महायुतीच्या मंत्र्यांचे वाभाडे काढणारे काही प्रकरण समोर आणले आहेत.

माणिकराव कोकाटे यांचा रमी खेळतानाचा व्हिडीओही त्यांनीच समोर आणला होता. त्यानंतर आता राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचाही एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करून त्यांनी खळबळ उडवून दिली होती. दरम्यान, आता याच रोहित पवार यांनी नवा मुद्दा हाती घेतला आहे. त्यांनी भाजपावर गंभीर स्वरुपाचे आरोप केले असून त्यांच्या या आरोपांमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

न्यायपालिकेला राजकीय आखाडा बनवण्याचा प्रकार नाही का? भाजपाच्या प्रवक्त्या राहिलेल्या आरती साठे यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे विरोधक चांगलेच आक्रमक झाले आहेत. रोहित पवार यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून भाजपावर सडकून टीका केली आहे. सार्वजनिक व्यासपीठावरून सत्ताधारी पक्षाची बाजू मांडणाऱ्या व्यक्तीची न्यायाधीश म्हणून नेमणूक होणं म्हणजे लोकशाहीवर केलेला सर्वात मोठा आघात आहे. याचा भारतीय न्याय व्यवस्थेच्या निःपक्षपणावर दूरगामी परिणाम होईल, असं मत रोहित पवार यांनी व्यक्त केलंय. तसेच केवळ न्यायाधीश होण्याची पात्रता आहे म्हणून थेट राजकीय व्यक्तींना न्यायाधीश म्हणून नेमणं म्हणजे न्यायपालिकेला राजकीय आखाडा बनवण्याचा प्रकार नाही का? असा सवालही त्यांनी उपस्थित केलाय.

संविधानाला हरताळ फासण्याचा हा प्रयत्न नाही का? सत्तेवर कुणाचा अंकुश निर्माण होऊन सत्तेचं केंद्रीकरण होऊ नये तसेच लहशलज्ञ रपव लरश्ररपलश राहावा यासाठी संविधानात seperation of power चं तत्व अवलंबलं आहे. राजकीय प्रवक्त्याची न्यायाधीशपदी नियुक्ती म्हणजे seperation of power च्या तत्वाला आणि पर्यायाने संविधानाला हरताळ फासण्याचा हा प्रयत्न नाही का? असाही रोखठोक सवाल त्यांनी केलाय.

न्यायदानाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार नाही का? जेंव्हा उच्च न्यायालयातील न्यायाधीश पदावरील व्यक्ती राजकीय पार्श्वभूमी आणि सत्ताधारी पक्षातील पदाचा उपभोग घेतलेली असेल तेंव्हा न्यायदानाची प्रक्रिया राजकीय आकस बाळगून होणार नाही, याची खात्री कोण देणार? एका राजकीय व्यक्तीच्या नियुक्तीने पुर्ण न्यायदानाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार नाही का?

सरन्यायाधीशांनी हस्तक्षेप करण्याची विनंती सदरील नियुक्त व्यक्तीच्या पात्रतेबाबत कुठलाही आक्षेप नाही, परंतु संबंधित व्यक्तीची नियुक्ती करताना 'न्यायदान हे सामान्य नागरिकांसाठी कोणत्याही अभिनिवेशाशिवाय असते' या सामान्य माणसांच्या भावनेलाच आघात बसत आहे. परिणामी संबंधित राजकीय व्यक्तीची न्यायाधीश पदावरील नियुक्तीबाबत पुनर्विचार करावा. आदरणीय सरन्यायाधीश साहेबांनीही याबाबत मार्गदर्शन करायला हवं, असं मतही रोहित पवार यांनी व्यक्त केलंय.

हा निर्लज्जपणाचा कळस आहे काँग्रेसनेही या नियुक्तीनंतर आक्रमक पवित्रा धारण केला आहे. हा निर्लज्जपणाचा कळस आहे. चक्क भाजप प्रवक्त्यांची न्यायाधीशपदी निवड होत आहे. लोकशाहीची क्रूर थट्टा भाजपने उघड चालवली आहे, असा हल्लाबोल काँग्रेसने केला आहे. त्यामुळे आता भाजपा नेमकं काय स्पष्टीकरण देणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## परभणीत काँग्रेसचा मास्टरस्ट्रोक..! शरद पवारांचा मातब्बर नेता लावला गळाला; पक्ष प्रवेशाची तारीख अन वेळही ठरली



मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे. परभणीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे मातब्बर नेते आणि माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी शरद पवारांची साथ सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. ७ ऑगस्टला दुपारी १२ वाजता मुंबईतील टिळक भवन येथे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत ते काँग्रेसमध्ये अधिकृत प्रवेश करणार आहेत. या घडामोडीमुळे शरद पवार यांच्या गटाला परभणी जिल्ह्यात मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. काँग्रेसचा मास्टरस्ट्रोक लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला यश मिळाले असले तरी विधानसभा निवडणुकीत महायुतीने महाविकास आघाडीला जोरदार धक्का दिला. यानंतर महाविकास आघाडीमधील अनेक नेते महायुतीच्या घटक पक्षांत सामील होत असल्याच्या बातम्या समोर येत होत्या. मात्र, परभणीत काँग्रेसने उलट शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला खिंडार पाडत बाबाजानी दुर्राणी यांना गळाला लावले आहे. दुर्राणी यांनी सत्ताधारी महायुतीऐवजी काँग्रेसची वाट धरल्याने ही राजकीयदृष्ट्या महत्त्वाची घडामोड मानली जात आहे.

सत्ताधारी गटात न जाता काँग्रेसची निवड बाबाजानी दुर्राणी यांच्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेशाच्या चर्चा गेल्या काही काळात रंगल्या होत्या. मात्र, त्यांनी सत्ताधारी गटात न जाता थेट काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या काँग्रेसमधून अनेक नेते आणि कार्यकर्ते बाहेर पडत असताना दुर्राणी यांचा प्रवेश काँग्रेससाठी दिलासादायक ठरण्याची शक्यता आहे. परभणीतील काँग्रेसच्या स्थानिक पातळीवरील पोकळी भरून काढण्यासाठी दुर्राणी यांचा प्रभाव आणि अनुभव महत्त्वाचा ठरेल. कोण आहेत बाबाजानी दुर्राणी? बाबाजानी दुर्राणी हे परभणी जिल्ह्यातील प्रभावशाली नेते आहेत. त्यांनी २००४ मध्ये पाथ्री मतदारसंघातून विधानसभा निवडणूक जिंकली होती. शरद पवार यांनी त्यांना २०१२ आणि २०१८ मध्ये विधान परिषदेवर पाठवले होते. २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर दुर्राणी काही काळ अजित पवार यांच्या गटात गेले होते. मात्र, तिथे त्यांना अपेक्षित संधी मिळाली नाही, त्यामुळे ते पुन्हा शरद पवार यांच्या गटात परतले. आता मात्र शरद पवार यांच्या गटाला सोडचिठ्ठी देत दुर्राणी काँग्रेसमध्ये प्रवेश करत आहेत. त्यांच्या या निर्णयामुळे परभणीतील काँग्रेसला बळ मिळण्याची शक्यता आहे.

परभणीत काँग्रेसला फायदा परभणी जिल्ह्यात दुर्राणी यांचा लक्षणीय जनाधार आहे, विशेषतः मुस्लिम आणि दलित समाजात त्यांचा प्रभाव आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी अजित पवार यांच्या गटासोबत असताना मुस्लिम आणि दलित मतदारांनी महायुतीला मतदान न केल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदवले होते. यामुळे त्यांनी शरद पवार यांच्या गटात परतण्याचा निर्णय घेतला होता, परंतु आता काँग्रेसमध्ये प्रवेश करून ते महाविकास आघाडीच्या बळकटीसाठी काम करणार आहेत. काँग्रेससाठी का महत्त्वाचे? परभणीतील काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वात निर्माण झालेली पोकळी दुर्राणी यांच्या अनुभवाने आणि जनाधाराने भरून निघण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा फटका बसला असताना दुर्राणी यांचा प्रवेश काँग्रेसला स्थानिक पातळीवर नवसंजननाचा संदेश देईल.

## पुण्यात उच्च न्यायालय खंडपीठाची गरज; सुप्रिया सुळेंची मुख्यमंत्र्यांकडे मागणी




शासनाने नुकतीच कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाला मंजुरी दिल्याने पश्चिम महाराष्ट्रातील कायदेशीर प्रक्रियांना गती मिळणार आहे. या निर्णयाचे स्वागत करताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आता पुणे येथेही उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची स्थापना करण्याची मागणी केली आहे. पुण्याच्या वाढत्या लोकसंख्या, प्रलंबित खटल्यांची संख्या आणि शहराचे शैक्षणिक, प्रशासकीय व औद्योगिक महत्त्व लक्षात घेता ही मागणी अत्यंत गरजेची असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

कोल्हापूर खंडपीठाचे स्वागत, आता पुण्याची पाळी महाराष्ट्र शासनाने कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाला मंजुरी दिल्याने तेथील नागरिकांना स्थानिक पातळीवर कायदेशीर सेवा मिळण्यास मदत होईल. सुप्रिया सुळे यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. त्या म्हणाल्या, कोल्हापूर खंडपीठाच्या मंजुरीमुळे स्थानिकांना मुंबईला जाण्याचा त्रास कमी होईल आणि खटल्यांचा निपटारा जलद होईल. याच धर्तीवर आता पुण्यातही खंडपीठ स्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.

पुण्याला खंडपीठ का गरजेचे? पुणे हे महाराष्ट्राचे शैक्षणिक, प्रशासकीय आणि औद्योगिक केंद्र आहे. सुळे यांनी पुण्यातील खंडपीठाची गरज अधोरेखित करताना विविध मुद्दे मांडले आहेत.

त्यांच्या म्हणण्यानुसार, पुणे शहर आणि पुणे जिल्ह्याची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. यामुळे कायदेशीर प्रकरणे आणि खटल्यांची संख्याही वाढली आहे.

पुणे आणि परिसरात प्रलंबित खटल्यांची संख्या मोठी आहे. स्थानिक खंडपीठामुळे या खटल्यांचा निपटारा जलद होऊ शकतो. पुणे हे शिक्षण आणि प्रशिक्षणाचे प्रमुख केंद्र आहे. येथील अनेक संस्था, उद्योग आणि प्रशासकीय कार्यालये यामुळे कायदेशीर बाबींची संख्या वाढली आहे. सुप्रिया सुळे यांची मुख्यमंत्र्यांना विनंती सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नम्र विनंती केली आहे. त्या म्हणाल्या, शासनाने नुकतेच कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयाचे आम्ही सर्वजण स्वागत करतो. परंतु आता याच धर्तीवर आता पुण्यात देखील खंडपीठ स्थापन करण्याची गरज आहे. पुणे शहर आणि परिसरातील लोकसंख्या आणि प्रलंबित खटल्यांची संख्या पाहता पुणे खंडपीठाची गरज लक्षात येईल. पुणे शिक्षण, प्रशिक्षण व प्रशासनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे शहर आहे. याखेरीज येथील बार असोसिएशनने सातत्याने ही मागणी शासनाकडे लावून धरली आहे. माझी मुख्यमंत्री महोदयांना नम्र विनंती आहे की कृपया याची आपण नोंद घेऊन मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुणे येथे करण्यास मंजुरी द्यावी. खंडपीठाचे फायदे काय? पुण्यातील नागरिकांना सध्या उच्च न्यायालयाच्या खटल्यांसाठी मुंबईला जावे लागते, ज्यामुळे वेळ आणि पैसा खर्च होतो. स्थानिक खंडपीठामुळे हा त्रास कमी होईल. प्रलंबित खटल्यांचा निपटारा जलद होऊन न्यायप्रक्रिया अधिक कार्यक्षम होईल. पुण्यातील वकिलांना स्थानिक पातळीवर उच्च न्यायालयात काम करण्याची संधी मिळेल, ज्यामुळे त्यांचा व्यवसाय आणि अनुभव वाढेल. खंडपीठामुळे पुण्यातील कायदेशीर सेवा क्षेत्राला चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ मिळेल. पुणे बार असोसिएशनची भूमिका पुणे बार असोसिएशनने गेल्या अनेक वर्षांपासून खंडपीठाच्या मागणीसाठी आंदोलने, निवेदने आणि चर्चासत्रांचे आयोजन केले आहे.

## एकनाथ शिंदे पुन्हा दिल्ली दौऱ्यावर; उद्धव ठाकरेंच्या आधी साधलेल्या अचूक टायमिंगची चर्चा सुरु



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज रात्री अचानक दिल्ली दौऱ्यावर जाणार आहेत. शिवसेना ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे हे बुधवारी दिल्ली दौऱ्यात जाण्याआधीच एकनाथ शिंदे अचानक दिल्ली दौऱ्यावर जाणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, रात्री दहा वाजता शिंदेंचे दिल्लीमध्ये आगमन होईल. उद्या दिवसभर दिल्लीतील विविध बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत. शिवसेना शिंदे गटाच्या खासदारांसोबत इतरही काही बैठकांमध्ये एकनाथ शिंदे सहभागी होणार आहेत. एकनाथ शिंदे हे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार का, याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# संपादकीय

## स्वदेशीची हाक

जागतिक आर्थिक अनिश्चितता असल्याने जनतेने स्वदेशी भावना स्वीकारावी आणि स्थानिक पातळीवर तयार झालेल्या उत्पादनांना पाठिंबा द्यावा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताची अर्थव्यवस्था मृतवत असल्याचा उल्लेख केला होता. खरे तर, भारत जगातील तिसरी अर्थव्यवस्था होण्याकडे वाटचाल करत आहे. अशावेळी भारतीय अर्थव्यवस्थेबाबत अनुद्गार काढणे, संतापजनकच आहे. देशाची खरी सेवा स्वदेशी वस्तूंना प्रोत्साहन देण्यात आहे. नागरिकांनी पुढील सण-उत्सवांत स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन मोदी यांनी दोन वर्षांपूर्वी केले होते. राजधानी दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय हातमाग दिनाच्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे आवाहन केले होते. स्वदेशीचा उद्देश केवळ विदेशी कपड्यांच्या बहिष्कारापुरता मर्यादित नव्हता, तर आर्थिक स्वातंत्र्याला मिळालेले ते एकप्रकारचे बळ होते. मुख्यत्वे भारतीयांनी विणकरांसोबत जोडण्याची ती एक मोहीम होती, याकडे त्यांनी लक्ष वेधले होते. मागील १० वर्षांत देशांतर्गत खादीच्या उत्पादनात तिपटीपेक्षा अधिक वाढ झाली, त्याच्या विक्रीत पाचपट वाढ झाली.

'आमच्याकडे गणपतीची मूर्तीही विदेशातून येते, होळीचे रंग आणि पिचकारीही चीनसारख्या देशातून येते, याकडे लक्ष वेधत, पंतप्रधानांनी विदेशी वस्तू वापरू नका. देशातील वस्तूच खरेदी करा,' असे आवाहन याआधीही केले असून, त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे. स्वदेशी उपक्रमाचाच एक भाग म्हणजे 'मेक इन इंडिया' योजना. २०१४ मध्ये देशात मोबाईलची निर्मिती करणारे केवळ दोन कारखाने होते. आज ही संख्या २०० हून अधिक झाली. भारताची मोबाईल निर्यात १ हजार ५५६ कोटींवरून १ लाख २० हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. जागतिकस्तरावर भारत दुसर्या क्रमांकाचा सर्वात मोठा मोबाईल उत्पादक बनला. आता देश पूर्णतः प्रक्रिया केलेल्या पोलादाचा निर्यातदार बनला आहे. २०१४ पासून पोलादाच्या उत्पादनात ५० टक्क्यांहून अधिक वाढ झाली. सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्राने दीड लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक आकर्षित केली असून, रोज ७ कोटींचे उत्पादन घेण्याची क्षमता असलेल्या पाच प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. नवीकरणीय ऊर्जेच्या बाबतीत देश जागतिक पातळीवर चौथ्या क्रमांकाचा सर्वात मोठा उत्पादक ठरला आहे. इलेक्ट्रिक वाहन उद्योग क्षेत्र, जे २०१४ मध्ये अस्तित्वातच नव्हते, ते आता तीन अब्ज डॉलर इतक्या उलाढालीचे झाले.

संरक्षण उत्पादनात भारताने आत्मनिर्भरता प्राप्त केली असून, निर्यात १ हजार कोटी रुपयांवरून वाढून २१ हजार कोटी रुपयांवर पोहोचली. पूर्वी भारतात खेळण्यांची आयात होत असे. आता खेळण्यांची निर्यात २३९ टक्क्यांनी वाढली आणि आयातही निम्मी झाली. इलेक्ट्रॉनिक्सपासून ते अंतराळ क्षेत्रापर्यंतचे यश स्वदेशीची प्रेरणा किती जागी आहे, याचेच निदर्शक. आज ट्रम्प यांच्या धोरणामुळे संपूर्ण जग अस्वस्थ असून, भारतीय शेअर बाजारही कोसळला आहे. अमेरिकी प्रशासनाने २५ टक्के आयात कर लागू केलाच आहे आणि त्यासोबतच भारत-रशिया व्यापारी संबंधांबद्दल नाराजी व्यक्त करत, भारतावर दंड लागू करण्याची घोषणा केली. भारतात २५ टक्के आयात कर असून, पाकिस्तानवर मात्र केवळ १९ टक्के, तर बांगला देशवर २० टक्के आयात कर लागू केला आहे. याचा अर्थ दक्षिण आशियात भारताचे स्थान जे उंचावलेले आहे, ते खाली जावे असाच अमेरिकेचा हेतू असावा. ट्रम्प यांच्या निर्णयाने त्याबद्दल बरीचशी स्पष्टता आली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या स्वदेशी नार्यामागे ही पार्श्वभूमी महत्त्वाची आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. कॅनडाने पॅलेस्टाईनला राजकीय मान्यता दिल्यामुळे, इस्रायलप्रमाणेच अमेरिकाही संतापली असून, कॅनडावर ३५ टक्के कर लावला आहे.

भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे अमेरिकेला पसंत नाही; पण भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे थांबवल्यास, ते अन्य देशांकडून खरेदी करावे लागेल आणि त्यासाठी ९ ते ११ अब्ज डॉलर इतकी ज्यादा रक्कम मोजावी लागू शकेल. रशिया-युक्रेन युद्धानंतर पाश्चात्त्य देशांनी रशियावर निर्बंध लावले. युद्धापूर्वी भारत रशियाकडून एक टक्काही तेल खरेदी करत नव्हता. आज भारताच्या तेल खरेदीचे हे प्रमाण ३५ ते ४० टक्क्यांपर्यंत वाढले. याचे कारण भारताला रशियाकडून कमी दराने तेल मिळते. मुळात भारतात ८५ टक्के कच्चे तेल आयात केले जाते. अशावेळी जेथून स्वस्त मिळते, तेथून खरेदी का करू नये? अशा कच्च्या तेलाचे शुद्धीकरण करून, रशियाने निर्बंध घातलेल्या देशांनाच पेट्रोलियम पदार्थांची निर्यात करून भारतीय कंपन्यांनी तुफान नफा कमावला; पण आता युरोपीय महासंघाने रशियन तेलापासून तयार झालेल्या उत्पादनांच्या आयातीवर बंदी घातली आहे. तसेच, अमेरिकेनेही भारतावर ज्यादा कर आणि दंड आकारण्याचा इशारा दिला आहे. वास्तविक, ही शुद्ध दादागिरी असून, भारत सरकार ती सहन करेल, असे दिसत नाही.

अमेरिकेने कोणत्याही अटी घालाव्यात आणि भारताने त्या मान्य कराव्यात, अशी वस्तुस्थिती नाही; पण देशांतर्गत उत्पादन क्षेत्रास चालना देण्यासाठी केंद्राने राज्यांनाही अधिक प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच, जीएसटी कर प्रणालीचीही फेररचना व्हायला हवी. देशांतर्गत खासगी गुंतवणूक अलीकडील काळात मंदावली. थेट अर्थव्यवस्थेशी संबंधित प्राधान्याचे अनेक विषय आहेत. नव्या आर्थिक बदलात विकासाची गती वाढवण्याचे मोठे आव्हान आहे. त्याचा धांडोळाही घ्यावा लागेल. १९०३ मध्ये ब्रिटिशांनी बंगालच्या फाळणीचा निर्णय जाहीर केल्यानंतर भारतीयांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. त्याला प्रतिसाद म्हणून ७ ऑगस्ट १९०५ रोजी कोलकाता येथील टाऊन हॉलमधून स्वदेशी चळवळीचा आरंभ झाला. देशांतर्गत उत्पादनावर अवलंबून राहून, विदेशी वस्तूंच्या वापरास आळा घालणे, हा त्यामागील उद्देश होता. महात्मा गांधी यांनी त्याचे वर्णन 'स्वराज्याचा आत्मा', म्हणजेच 'स्वराज्य' असे केले होते. आज १२० वर्षांनंतर पुन्हा तीच हाक देण्याची वेळ आली आहे.

# मुंबई येथील छप्परबंद समाजाने मात केलेला दुष्काळ काळ! आता तरी समाज जागा होईल का.!

जिल्हा बीड,तालुका वडवणी या गावातील रुईपिंपळा चिखलबीड वडवणी पिंपरखेड पिंपळा कवडगाव सुरुडी या गावातील विमुक्त भटक्या जातीतील मोडणाऱ्या छप्पर बंद समाजातील लोक राहत होती . सन १९७२दुष्काळ व आणीबाणीच्या काळ होता .याकाळात जनावरे सुद्धा पाण्यावाचून तडफडत मरत होती. कित्येक लोकांचा पोटाला अन्न न मिळाल्याने उपासमारीने जीव जात होता. हा लयच भयंकर कठीण काळ होता. यावेळच्या माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी आणिबाणी घोषित केली. गरीब जनता भुकेने व्याकुळ होऊन जीव सोडत होती .माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी याने खडी फोडायचे काम उपलब्ध करून दिले.तेव्हा माणसं कुठेतरी जगू लागली. यावेळी मजुरी होती १आना. अशा भयंकर परिस्थित लोक तग धरून संघर्ष करत होती. आलेला दिवस लोटला जात होता. दिवसेंदिवस खेडेपाड्यात परस्थिती खूपच बिकट होत आहे हे अंतर्भूत गोष्ट लक्षात आल्यावर आपण शहराकडे वळावे ! तिथे हा प्रश्न सुटेल ...आशा मनाशी स्वप्न बाळगून विमुक्त भटक्या जात जमातीतील बरेच लोकांनी मुंबई गाठली. मुंबई शहराकडे आल्यावर इथे तिचं अवस्था होती. पोट तरी कस भरावं हा प्रश्न सतावत होता. छप्परबंद समाजातील लोक रस्त्यावर भीक मागत जीवन जगू लागली. यावेळी मुंबईत आपली सोय कुठे लागेल. यांची चाचपणी करून मुंबईत कांदिवली विभाग निवडला. येथे नदी नाले व डोंगराळ विभाग होता याच काळी येथे वस्त्या बनवून राहू लागले. सुरवातीस पाडा संबोधू लागले .कालांतराने यापाड्यांचे रूपांतर नगरात झाले. सध्या हा भाग दामू नगर ओळखला जाऊ लागला. असो...! नंतर याच १९८० च्या दशकात कांदिवलीतील भागात महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी विस्थापित झाली. यामुळे आसपास राहणाऱ्या लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली. लोकांना कंपनी रोजगार उपलब्ध झाल्यामुळे हळूहळू रोजगाराचा प्रश्न सुटत होता. पहाटे उठून चुलीवर भाकऱ्या थापटून हा छप्परबंद समाजातील लोक कंपनीत कामाला जाऊ लागले .सकाळी सहा ते सायंकाळी तीन वाजेपर्यंत काम करत होती. कामावरून घरी परतल्यावर थोड ही विसावा न घेता डोंगराळ भागात जाऊन लाकड तोडू लागली. ही तोडलेली लाकड उन्हात सुकवत आसपासच्या पाड्यात विकू लागले. यामधून मिळणाऱ्या पैशातून संसाराचा गाडा चालवत होती. कसेबसे कठीण दिवस पुढे ढकलत होते. हळूहळू बदल घडत होता. मुंबईत छप्परबंद समाज इतर लोक लकडेवाले मुसलमान म्हणून ओळखू लागले. सन १९७२ ते १९९२ दरम्यान काळ खूप संघर्षमय राहिला. आज माझे वडील हा किस्सा सांगताना डोळ्यात अश्रू येत होती.माझे आई बाबा कधीमधी किस्सा आठवत डोळ्यात आलेल्या अश्रूंना मोकळी वाट करून देत होते. हा भयंकर काळ आमच्या नशीब होता. व आम्ही हा अत्यंत वाईट काळ सोसला अशीआपबिती हकीकत सांगत होते. सदर गोष्टी ऐकून आम्ही सुद्धा भाऊक होत होतो .आमचे सुद्धा डोळे अश्रूंनी भरून येत होते.खरंच हा काळ आमच्या नशिबी नाही. यामध्ये आम्ही धन्यता मानत होतो... कालांतराने जीवनशैलीत बदल झाला. कच्च्या झोपड्यांचे पक्के घरे झाली. येथे आज घडीला मुंबईतील कांदिवलीतील दामू नगरात छपरबंद समाजाची ६०० ते ८०० लोक राहतात. यासमाजातील पोर शिक्षण घेत आहे.शिक्षण घेऊन चांगल्या हुद्द्यावर जाता यावं ही मनोकामना छप्परबन समाजातील प्रत्येक पालकांच्या मनात कायम आहे.आमच्या आई-वडिलांनी हा मरण यातना जिवंतपणे सोसल्या होत्या. जे माझ्या वाट्याला आलंय ते माझ्या लेकाच्या वाट्याला येऊ नये .ही महत्वकांक्षा या समाजातील प्रत्येक पालकांच्या मनात आहे आमचे आई वडील अडाणी असल्याने आपल्या मुलास योग्य करिअर मार्गदर्शन देऊ शकले नाही. प्रत्येक गोष्टीत डॉक्युमेंट अडचण निर्माण होत होती .रेशनिंग कार्ड आधार कार्ड, पॅन कार्ड, जुने झोपडपट्टी ओळखपत्र ,लाईट बिल ,इलेक्शन कार्ड, यासारखे डॉक्युमेंट पदरी पाडून घेतले. परंतु जातप्रमाणपत्र सारख्या अती महत्वाचा डॉक्युमेंट काढता आला नाही. सदर या समाजातील पालक वर्ग अशिक्षित असल्याने १९६८ वर्षाचा पुरावा याकामाकरीता गार्ह्य धरला जातो.कारण आमचे आजोबा पंजोबा सुद्धा अडाणी होते .यांचे शिक्षणात कुठे नोंद नव्हती. आलीकडील काळात हीच विद्यार्थी मॅट्रिक, बारावी, ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट झाली . जुन्या काळातील पुरावा नसल्याने विमुक्त भटक्या जाती जमातीतील मोडणाऱ्या याछप्परबंद समाजकडे जातीचा दाखला नसल्याने, समाजातील शिक्षित विद्यार्थीना उच्च शिक्षणापासून कायम मुकावे लागले.शिक्षणासाठी व कोर्ससाठी लागणारे भरमसाठ फीस देण्याची ऐपत पालकांकडे नव्हती .यामुळे पालकांचे आर्थिक गणित बिघडल्याने बरेच काही विद्यार्थी शिक्षणपासून विंचित राहू लागले.शिक्षण प्राप्त करून सुद्धा चांगल्या हुद्द्यावर जाता येत नाही, ही खंत यांच्या मनात कायम आहे! शिकून काय फायदा? ही मानसिक अवस्था झाली .शेवटी पदरी निराशा कायम पडली. याच समाजातील विद्यार्थी हाताला मिळेल ते काम करू लागला.यात प्रामुख्याने रिक्षा चालक ,मोलमजुरी भाजीपाला व्यवसाय, वडापाव स्टॉल फूड व्यवसाय चालवत जीवन जगत आहे . काही विद्यार्थी व्यसनाच्या आहारी जाऊन जीवन संपवल .काहींनी राजकीय पक्षाच्या आधार घेतला काही विद्यार्थ्यांनी चोरी हाणामारी करत क्रिमिनल रेकॉर्ड अंगावर घेतले आज घडीला कोर्टकचेरीच्या पायरी झिजवत आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यामुळे कुठे नोकरी मिळत नाही... शेवटी अशा प्रकारे ही मुलं शाळा बाह्य होत भरकटली . समाजातील सुशिक्षित मुली बाबतीत तोच प्रश्न कायम आहे . काही सुशिक्षित तरुण मुलींना करियर मार्गदर्शन न लाभल्याने उच्चभ्रू इमारतीमधील घर कामाला पसंती दिली. तसेच काही प्रमाणात थोडी फार विद्यार्थी चांगल्या हुद्द्यावर आहे.अशा असंख्य वेदना घेऊन हा समाज जगत आहे. मायबाप सरकार याकडे लक्ष देतील का?... अशी आरोळ हा समाज देत आहे...!आमच्या मदतीला कोणीतरी धाव घेईल...! कोणीतरी आमचा तारणहार होईल का? आमच्या आशा कोणीतरी पल्लवीत करेल का... ? आमच्या याव्यथा मायबाप सरकारकडे मांडता येईल का ... ? हे सरकार आमच गरहान ऐकलं का ... ?आमच्यातला कोणीतरी एखाद ख-ड- खझड होइल का .... ? अशा असंख्य प्रश्नांची उत्तर मिळतील का.?... असा प्रश्न मनात कायम आह

पुढील वाटचाल पाहता शिकलेले होतकरू विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक आर्थिक राजकीय व सामाजिक प्रगती करिता आपले सहकार्य अपेक्षित आहे ,तसेच महाराष्ट्र छपरबंद समाज विकास परिषद सदर प्लॅटफॉर्म अंतर्गत आम्हास वेळोवेळी मार्गदर्शन करून शासनाच्या सोयी सुविधा या संस्थेमार्फत आमच्यापर्यंत पोहोचवा हीच आग्रहाची अपेक्षा ... .

जातीचा दाखला नसल्याने होणारे परिणाम

उच्च शिक्षणासाठी वंचित

विदेशात नोकरीची संधी न मिळणे.

आरोग्याचे प्रश्न,एरणीवर शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया अडचण.

राजकीय प्रतिनिधी नेतृत्वाचाआभाव

जातीचा दाखला नसल्याने उच्च शिक्षणापासून वंचित

महामंडळाकडून मिळणाऱ्या कर्जफपासून वंचित

शासकीय व निम शासकीय नोकरी पासून वंचित

तहसीलदार व जिल्हाधिकारी लेव्हलचे दाखले पासून वंचित.

मेडिकल व आरोग्यक्षेत्रात करिअर पासून वंचित.

..........................................

मागणी...

भरकटले व शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणणे.

शासकीय व नीम शासकीय नोकरी मार्गदर्शन करणे.

व्यसनहीन तरुणास आरोग्यमय जीवन जगण्यास प्रोत्साहन करणे.

कायदेविषयक सल्ले देणे.

तरुण मुलीस शिक्षणास प्रोत्साहन करणे.

(चुल व मूल ही प्रथा मोडीत काढणे ).

जातपंच कायदेविषयक माहिती देणे. महामंडळ यास कडून उपलब्ध होणाऱ्या कर्जाची माहिती करून देणे.

वेळोवेळी कार्यशाळा आयोजित करणे व मार्गदर्शन करणे.

हा लेख शहामत शेख ( पत्रकार) यांच्या पालकांनी अनुभवलेल्या विचारातून साभार...

# सरकारी योजनांचा फायदा योग्य लाभार्थ्यांना होण्यासाठी विदा यंत्रणा भक्कम हवी

कुठल्याही सरकारी योजनेच्या अंमलबजावणी साठी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे परिपूर्ण डेटा. तो नसेल तर त्या योजनेचे कसे बारा वाजतात याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे महाराष्ट्र राज्य सरकारची 'लाडकी बहीण योजना'. प्रगत, डिजिटल असा झेंडा मिरवणाऱ्या राज्य सरकारकडे आपल्या राज्यातील नागरिकांचा कुठलाच विश्वसार्ह व परिपूर्ण असा डेटा नसल्याने या योजेनचा गैरफायदा तब्बल २६ लाख महिलांनी व १४ हजार ५०० पुरुषांनी घेतलेला आहे. महिलांसाठी असणाऱ्या योजनेत पुरुष लाभार्थी पात्र ठरत असतील, तर हा प्रकार महाराष्ट्र राज्य सरकारच्या कार्यक्षमतेची आणि डीबीटी म्हणजेच डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फर या व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगणारा ठरतो. भविष्यात याची पुनरावृत्ती टाळण्यासाठीचा एकमेव व सर्वोत्तम ऊपाय म्हणजे 'परिपूर्ण डेटा संकलन'.

महाराष्ट्र असो की संपूर्ण देश. गेल्या पाच सहा दशकात विविध कल्याणकारी योजना आखल्या गेल्या. त्यावर लाखो करोडो रुपये खर्च केले गेले. योजनांचा फायदा झालाच नाही असे नाही परंतु बहुतांश योजनांची फलश्रुती प्रश्नार्थकच राहिलेली आहे, हे कोणीही नाकारू शकत नाही. योजनांच्या अंमलबजावणीतील दोष त्यास कारणीभूत आहेतच, पण त्याहीपेक्षा योजनांचा लाभ खऱ्या लाभार्थ्यापर्यंत पोचवण्यातील सर्वाधिक अडथळा म्हणजे वास्तववादी, परिपूर्ण, विश्वासार्ह माहितीचा अभाव.

सरकारने गुंतवलेल्या पैशाचे अपेक्षित परिणाम होतात याची खात्री करण्यासाठी डेटा-आधारित निर्णय घेणे महत्त्वाचे आहे. याचा अर्थ असा होतो की घेतलेले निर्णय विश्वसनीय डेटाद्वारे सूचित केले जातात. राज्यकर्त्यांना धोरणे बनवण्यासाठी किंवा कल्याणकारी योजना राबवण्यासाठी सर्वाधिक गरजेचे असते ते नागरिकांच्या सामाजिक, आर्थिक माहितीचे संकलन. आपल्या देशात अशा प्रकारच्या विश्वासार्ह माहितीचा नेहमीच अभाव असल्याने 'योजनांचा सुकाळ ,पण फलश्रुतीचा अभाव' ही आपल्याकडची नेहमीची परिस्थिती असते. योजना असंख्य असूनही आजही अनेक गरजू लाभार्थी प्रत्यक्ष लाभापासून वंचितच आहेत. विश्वासार्ह, परिपूर्ण डेटा संकलनाचा अभाव असल्याचा फटका सर्वच योजनांना बसतो आहे.

अन्नसुरक्षेसाठी आपल्या देशात 'रेशन वितरण व्यवस्था' आहे. वर्तमानात अधिवेशनातच ही बाब समोर आली आहे की पात्र नसणाऱ्या लाखो सरकारी कर्मचाऱ्यांनी वर्षानुवर्षे या योजनेचा लाभ घेतला आहे. व्यक्ती मृत होऊन ५/१० वर्ष होऊन देखील त्या व्यक्तीच्या नावाने धान्याचा लाभ घेतला जातो. एवढेच कशाला नुकतेच एक प्रकरण उजेडात आलेले आहे की अगदी यूपीएससी सारख्या यंत्रणेची फसवणूक करून कागदोपत्री ४० करोड संपत्ती असणाऱ्या व्यक्तीच्या मुलीने क्रिमी लेयर घटकाखाली भाप्रसे पदाचा लाभ घेतलेला आहे.

योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणात देखील समन्वय नसल्याने एकाच योजनेसाठी पात्र असणारी व्यक्ती वेगवेगळ्या अन्य योजनांचा लाभ घेताना दिसतो. याचे कारण एकाच सरकारी यंत्रणांकडे अगदी ग्रामपंचायत पातळीपासून ते राज्य -केंद्र स्तरापर्यत प्रत्येक नागरिकाच्या बाबतीतील आवश्यक आर्थिक ,सामाजिक गोष्टीविषयी केंद्रीभूत पद्धतीने डेटाचा अभाव.

गेल्या सात दशकांत अनेक धोरणे आणि योजना सुरू करण्यात आल्या, परंतु या योजनांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात अपयश आल्याचे दिसते. यामुळे एकुणातच भारताची प्रतिमा इर्शीं ळप श्रिरपपळपस, लीीं र्थीीं ळप खाश्रिळाशपींरींळेप अशी झालेली दिसते . याचे मुख्य कारण म्हणजे योजना तयार करण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक वस्तुनिष्ठ माहिती संकलनाचा अभाव.

डेटा संकलन मोहीम गरजेची: सरकारी यंत्रणांकडे वस्तुनिष्ठ, विश्वसार्ह डेटा नसल्याने बहुतांश सरकारी योजनांमध्ये हक्काचे लाभार्थी मोठ्या संख्येने मागे राहतात. दुसरीकडे, अनेक बेकायदेशीर प्राप्तकर्ते खोट्या कागदपत्रांमुळे दावा करतात आणि लाभ मिळवतात. त्यामुळे अनेक सरकारी योजना प्रयत्न करूनही अपयशी ठरतात.

राज्य स्थापनेच्या ६५ वर्षानंतर देखील आजही अगदी ग्रामपंचायत हद्दीत पासून ते मंत्रालय पातळीपर्यंतच्या कोणत्याच यंत्रणेकडे राज्यातील ज्या नागरिकांसाठी योजना राबवल्या जातात त्यांची विश्वासार्ह वस्तुनिष्ठ परिपूर्ण माहिती नसते. एवढेच कशाला शासनातर्फे राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांविषयीची माहिती ग्रामपंचायत पातळीवर देखील उपलब्ध नसल्याने योजनांच्या बाबतीत बट्ट्याबोळ होतो आहे. योजना राबवणाऱ्या यंत्रणांत समन्वय नसल्याने योजनांची कशी फसगत होते याचे उदाहरण म्हणून सुनियोजित शहर नवी मुंबईचे देता येईल.

गेल्या काही वर्षात पालिकेने करोडो रुपये खर्च करून एलईडी हायमास्ट बसवलेले असताना त्याच शहरासाठी केंद्र सरकारकडून 'सोलर हायमास्ट' ची योजना देण्यात आली. त्याचा परिणाम असा होताना दिसतो आहे की, ज्या ठिकाणी हायमास्ट उभे आहेत त्याच हायमास्टच्या उजेडाला स्पर्धा करणारे सोलर हायमास्ट उभारले जात आहेत. यंत्रणांच्या पातळीवर एवढा गोंधळ असेल तर नागरिकांच्या पातळीवर, कुटुंबाच्या पातळीवरील योजनांची काय अवस्था असेल याचा अंदाज येऊ शकतो. दुसरे उदाहरण मराठा आरक्षण सर्वेक्षणाचे देता येऊ शकेल. ग्रामसेवकापासून ते जिल्हाधिकाऱ्यापर्यंत सर्व नोकरशाहीला कामाला जुंपले होते. प्रत्येक योजनेच्या बाबतीत अशी अवस्था दिसते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाचा अपव्यय होताना दिसतो.

यावरील सर्वोत्तम आणि एकमेव उपाय म्हणजे राज्य सरकारने ग्रामपंचायत स्तरापासून ते राज्याच्या मंत्रालय पातळीपर्यंत उपलब्ध तंत्रज्ञानाच्या मदतीने वस्तुनिष्ठ, वास्तवदर्शी, परिपूर्ण असा डेटा संकलन



उपक्रम राबवावा. टीसीएससारख्या संस्थेला कंत्राट देऊन प्रत्येक ग्रामपंचायतीतील, नगर पंचायतीतील, महापालिकेतील नागरिकांचा शिक्षण, आर्थिक स्थिती, जात -धर्म, पशुप्राणी संख्या, वर्तमानात घेतल्या जाणाऱ्या योजनांची माहिती, दुचाकी, चारचाकी गाडीची उपलब्धता, निवासाचा प्रकार (झोपडी, कच्चे घर, पक्के घर, बंगला, बहुमजली इमारतीत सदनिका इत्यादी) मोबाईल क्रमांक, आधार -पॅन -रेशनकार्ड अशा सर्व गोष्टीं बद्दलचा डेटा संकलित करावी.

डेटा संकलन जलद गतीने करता यावे यासाठी संकेतस्थळ किंवा अँप निर्माण करून त्याच्या आधारे आधार ओटीपी आधारित लिंकद्वारे माहिती भरण्याची सुविधा द्यावी. ज्या कुटुंबातील व्यक्ती संगणक साक्षर आहेत ते सदरील माहिती स्वतः भरू शकतील. असे केल्यास ज्या कंपनीला कंत्राट दिले जाईल त्याचा प्रतिनिधी प्रत्यक्ष भेट देऊन जलदगतीने माहितीची सत्यता तपासू शकेल. उर्वरित माहिती संकलित करू शकेल.

सर्व योजना आधार -पॅन, प्रॉपर्टी कार्ड /७-१२ शी संलग्न करा :

व्यक्तीच्या जन्माबरोबरच त्याच्याबाबतच्या डेटा निर्मितीची प्रक्रिया सुरु व्हायला हवी आणि मृत्यूनंतर लगेचच निष्कासित केली जायला हवी. व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर आधार सारखा महत्वपूर्ण दस्ताऐवज निष्क्रिय केला जायला हवा जेणेकरून त्याचा दुरुपयोग केला जाऊ शकणार नाही. अपात्र लाभार्थी टाळण्यासाठी राज्य सरकारने आपल्या अखत्यारीतील सर्व विभागांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक पातळीवर राबवल्या जाणाऱ्या सर्व योजना या आधार क्रमांक, पॅन क्रमांकाशी जोडाव्यात. तंत्रज्ञानाची उपलब्धी पाहता गोष्ट अवघड नक्कीच नाही.

नागरिकांच्या, समाजाच्या माहितीत सातत्याने बदल होत असतो, ही त्यातली एक खोच असू शकते. पण त्यासाठी उपाय आहेत. उदा. एखादी व्यक्ती मृत पावली व ज्या सरकारी यंत्रणेने त्या व्यक्तीचा मृत्यूचा दाखला तयार केला आहे त्या यंत्रणेने आपल्या पातळीवरील डेटामध्ये त्या व्यक्तीला मृत गटात टाकले तर आपसूकच अन्य यंत्रणांना ते कळू शकेल व त्याला दिल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ थांबवता येऊ शकेल.

माहितीचे संकलन परिपूर्ण असेल तर १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी अर्ज करा, कागदपत्रे जोडा हा सोपस्कार न करता देखील सदरील नागरिकाचे नाव मतदार यादीत आपसूकच समाविष्ट करता होऊ शकेल. राज्यसरकारकडे वस्तुनिष्ठ डाटा असेल तर मनुष्यबळाचा अपव्यय कसा टाळला जाऊ शकेल या साठी तलाठ्याकडून दिल्या जाणाऱ्या उत्पनाच्या दाखल्याचे देता येऊ शकेल. कुठल्याही सरकारी योजनेचा लाभ घेण्यासाठी उत्पन्न ही सर्वात महत्वाची अट असते. हा दाखला केवळ त्या आर्थिक वर्षेसाठीच ग्राह्य धरला जातो. हा द्राविडी प्राणायाम टाळण्यासाठी संकलित डेटा महत्वपूर्ण भूमिका बजावू शकतो. जी सरकारी यंत्रणा योजनेची अंमलबजावणी करत आहे ती उपलब्ध डेटाच्या आधारेच सदरील लाभार्थ्याला पात्र /अपात्र ठरवू शकेल. प्रत्येक वेळी उत्पनाचा दाखला मागवण्याची आवश्यकता उरणार नाही.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने डेटा अपडेट सहज संभव : नागरिकांचा डेटा ही बदलणारी बाब आहे आणि त्यामुळे वारंवार डेटा अपडेट करणे आवश्यक असते. आधुनिक तंत्रज्ञान, संगणकीकरण, आर्टिफिशियल इंटेलिजन्स यामुळे देशातील १४० करोड जनतेचा डेटा अपडेट करणे सहज शक्य आहे. समजा १२ वी पास अशी नोंद असणाऱ्या व्यक्तीने पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याला आधार ओटीपी बेस्ड, आधार बायोमेट्रिक ओळखीच्या सहाय्याने संकेतस्थळावर किंवा पवर डेटा अपलोड करण्याची सुविधा देऊन, सर्टिफिकेट अपलोड करण्याची सुविधा देऊन डेटा अपडेट केला जाऊ शकतो. एवढेच नव्हे तर संलग्न महाविद्यालयाने सर्टिफिकेट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर त्याच्या सहाय्याने डायरेक्टसंबंधित विद्यार्थ्यांच्या संकलित डेटा अपडेट केला जाऊ शकतो.

थोडक्यात काय तर उपलब्ध तंत्रज्ञानाचा परिपूर्ण पद्धतीने उपयोग केला तर प्रत्येक नागरिकाचा डेटा सातत्याने अपडेट केला जाऊ शकतो . योजनांचा गैरफायदा टाळण्यासाठीसरकारी यंत्रणांच्या बरोबर सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असण्याचा नियम /कायदा केल्यास अपात्र लाभार्थीना मोठ्या प्रमाणावर आळा घातला जाऊ शकेल. उदा : ग्रामपंचायती मार्फत राबवल्या जाणाऱ्या योजनेतील लाभार्थीची यादी पब्लिक डोमेनवर उपलब्ध असेल तर त्या गावातील सजग नागरिक अपात्र लाभार्थींची माहिती सरकारी यंत्रणांना देऊ शकतील. लाभार्थ्यांच्या पात्रतेवर आक्षेप नोंदवू शकतील, राजकीय लागेबांधे, आर्थिक गैरप्रकारातून लाभ घेणाऱ्या अपात्र लाभार्थ्यांविषयी आक्षेप नोंदवू शकतील. याचा अर्थ जनतेचा तिसरा डोळा सरकारी योजनेच्या लाभार्थ्यांवर राहिला तर निश्चितपणे त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येईल.

पराकोटीची पारदर्शकता हीच योजना राबवणाऱ्या यंत्रणेतील अपप्रवृत्तीला आणि योजेनचा गैरफायदा उठवणाऱ्या अपात्र लाभार्थ्यांवर अंकुश आणण्यासाठी आणि योजनेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी ही गुरुकिल्ली ठरू शकते. आगामी जनगणना उपक्रमासाठी देखील या डेटाचा उपयोग होऊ शकेल.

# मोड आलेल्या 'या' भाज्यांचे सेवन केल्यास शरीरात तयार होतील विषारी तत्व, वाढेल उलटी आणि डायरियाचा धोका





दीर्घकाळ निरोगी आणि आनंदी राहण्यासाठी पोषण आहार घेणे आवश्यक आहे. रोजच्या आहारात फळे, भाज्या, सुका मेवा आणि इतर पौष्टिक पदार्थांचे सेवन केल्यामुळे शरीरातील सर्वच अवयव निरोगी राहतात. निरोगी आरोग्यासाठी संतुलित आहार, भरपूर पाणी आणि पुरेशी झोप घेणे गरजेचे आहे. पण बऱ्याचदा पावसाळ्याच्या दिवसांमध्ये दूषित पाण्यात उगवलेल्या भाज्यांचे सेवन केल्यामुळे आरोग्य बिघडण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसांमध्ये घरी आणलेल्या भाज्या स्वच्छ पाण्याने धुवून घेतल्या जातात. भाज्यांमधील कीड, मोठं मोठ्या अळी शरीरात गेल्यानंतर मेंदूमध्ये जातात. त्यामुळे घरी आणलेल्या भाज्या व्यवस्थित स्वच्छ करून घ्या. पोषक आहारात पालेभाज्या, कडधान्य, फळे इत्यादी पदार्थांचे सेवन केले जाते. पण बऱ्याचदा हेच पदार्थ आरोग्यासाठी घातक ठरतात. बाजारातून विकत आणलेल्या भाज्या जास्त वेळ तशाच पडून राहिल्यानंतर त्यांना हळूहळू मोड येतो. मोड आलेल्या भाज्या बनवलेल्या जातात. पण आहारात मोड आलेल्या भाज्यांचे अजिबात सेवन करू नये. मोड आलेल्या भाज्यांमध्ये विषारी घटक तयार होतात, के घटक पोटात गेल्यानंतर आतड्यांमध्ये किंवा पोटात विष तयार होण्याची जास्त शक्यता असते. अशा भाज्यांच्या सेवनामुळे उलट्या, मळमळ होऊ शकते. चला तर जाणून घेऊया मोड आलेल्या कोणत्या भाज्या खाऊ नयेत.

मोड आलेल्या 'या' भाज्यांचे अजिबात करू नका आहारात सेवन:

कांदा: जेवणात वापरला जाणारा अतिशय महत्वाचा पदार्थ म्हणजे कांदा. कांद्याशिवाय जेवणाला व्यवस्थित चव लागत नाही. कांद्याच्या वापरामुळे पदार्थाची चव वाढते. पण बऱ्याचदा पावसाळ्याच्या दिवसांमध्ये जास्त प्रमाणात कांदे आणून ठेवले जातात. हे कांदे मोठ्या भांड्यात किंवा गोणी भरून ठेवले जातात. त्यामुळे कांद्यांना मोड येण्याची जास्त शक्यता असते. मोड आलेले कांदे कापून खाल्ले जातात. मोड आलेल्या कांड्यांमध्ये अल्कलॉइड खासकरून एन–प्रोपाइल डायसल्फाइडचे प्रमाण वाढते, ज्यामुळे शरीरातील लाल रक्तपेशींना हानी पोहचण्याची जास्त शक्यता असते. तसेच यामुळे हेमोलिटिक ॲनीमिया होऊ शकतो.

लसूण: डाळ किंवा भाजीला फोडणी देताना लसूणचा वापर केला जातो. लसूणच्या वापरामुळे पदार्थाची चव वाढते. पण मोड आलेला लसूण अजिबात खाऊ नये. यामुळे पचनक्रियेसंबंधित समस्या उद्भवून उलट्या, मळमळ किंवा लाल रक्तपेशींना हानी पोहचते. शरीरासाठी लाल रक्तपेशी अतिशय महत्वाच्या आहेत. त्यामुळे मोड आलेली लसूण खाऊ नये.

(संबंधित प्रश्न)

मोड आलेल्या भाज्या का खाऊ नये?

मोड येण्याची प्रक्रिया उघड्यावर किंवा अस्वच्छ स्थितीत झाल्यास, बॅक्टेरिया वाढू शकतात, ज्यामुळे अन्न विषबाधा होऊ शकते. बटाट्याला मोड आल्यावर सोलानिन आणि चाकोनिन नावाचे विषारी घटक तयार होतात, जे विषारी असू शकतात आणि ते खाल्ल्यास आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात.

मोड आलेल्या भाज्या खाताना काय काळजी घ्यावी?


मोड येण्याची प्रक्रिया स्वच्छ आणि सुरक्षित ठिकाणी करावी. मोड आलेली कडधान्ये चांगली शिजवून खावी, ज्यामुळे बॅक्टेरिया नष्ट होतील.

# तोंडाची खराब झालेली चव सुधारण्यासाठी झटपट बनवा आंबटगोड कोकम चटणी, पित्त होईल कमी

दिवसभर काम करून थकल्यानंतर रात्रीच्या जेवणात प्रत्येकालच पोटभर आणि चविष्ट पदार्थ खाण्यास हवे असतात. डाळ, भात, भाजी आणि भाकरीसोबत जेवणात तोंडी लावण्यासाठी काहींना काही गोड किंवा तिखट पदार्थ खाण्याची सगळ्यांचं इच्छा होते. जेवणात नेहमीच खीर किंवा अतिगोड पदार्थ खाणे आरोग्यासाठी चांगले नाही. या पदार्थांच्या सेवनामुळे मधुमेह किंवा आरोग्यासंबंधित आजार वाढण्याची जास्त शक्यता असते. अशावेळी तुम्ही जेवणात तोंडी लावण्यासाठी आमसुलाची चटणी बनवू शकता. आमसुलांना कोकम सुद्धा म्हंटले जाते. मासे, सोलकढी किंवा पदार्थाचा उग्र वास घालवण्यासाठी कोकमचा वापर केला जातो. कोकम खाल्यामुळे शरीरात वाढलेली ॲसिडिटी किंवा पित्त कमी होते. वारंवार पचनाच्या समस्या उद्भवत असतील तर नियमित कोकम सरबत प्यावे. यामुळे पित्त कमी होईल आणि शरीराला अनेक फायदे होतील.चला तर जाणून घेऊया कोकम चटणी बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

- कोकम
- मीठ
- साखर
- खोबर
- हिरवी मिरची
- आलं
- हिंग
- कोथिंबीर
- कढीपत्ता
- तेल





कृती:

कोकम चटणी बनवण्यासाठी सर्वप्रथम, ओल्या नारळाच्या आतील खोबर किसून घ्या. त्यासोबतच कोथिंबीर सुद्धा बारीक चिरा. मिक्सरच्या भांड्यात किसून घेतलेलं खोबर, कोथिंबीर, हिरवी मिरची, जिरं आणि आल्याचा बारीक तुकडा टाकून वाटून घ्या. चटणी बारीक करताना त्यात जास्त पाणी टाकू नये.

त्यानंतर त्यात साखर, आमसुल, चवीनुसार मीठ आणि लसूण पाकळ्या टाकून पुन्हा एकदा बारीक वाटून घ्या.

फोडणीच्या वाटीमध्ये तेल गरम करून त्यात कढीपत्त्याची पाने, हिंग घालून गरम करा आणि तयार केलेल्या चटणीमध्ये फोडणी टाकून मिक्स करा.

सगळ्यात शेवटी वरून बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून चटणी सर्व्ह करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली कोकम चटणी.

# उपवासाच्या दिवशी सकाळच्या नाश्त्यात झटपट बनवा खमंग मऊ उपवासाचा पराठा, उद्भवणार नाही पित्ताचा त्रास

सकाळच्या नाश्त्यात अनेक वेगवेगळ्या पदार्थांचे सेवन केले जाते. कांदापोहे, उपमा, शिरा किंवा इतर अनेक वेगवेगळे पदार्थ बनवून खाल्ले जातात. मात्र उपवासाच्या दिवशी नेमकं काय खावं? हे बऱ्याचदा सुचत नाही. साबुदाणा खिचडी, साबुदाणा वडा, बटाटा हेच ठराविक पदार्थ खाल्ले जातात. मात्र उपाशी पोटी साबुदाण्याचे सेवन केल्यामुळे पोटात ॲसिडिटी वाढून अपचन होते. गॅस, आम्लपित्त वाढते आणि वारंवार आंबट ढेकर येऊ लागतात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला उपवासाच्या दिवशी खमंग मऊ पराठा बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हा पराठा कमीत कमी साहित्यामध्ये झटपट तयार होतो. उपवासाच्या दिवशी शरीरातील ऊर्जा काहीशी कमी होऊन जाते. ऊर्जा टिकून ठेवण्यासाठी पोटभर नाश्ता करावा. चला तर जाणून घेऊया उपवासाचा पराठा बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

- साबुदाणा
- बटाटा
- हिरवी मिरची
- शेंगदाण्याचा कूट
- तूप
- जिरं





कृती: पराठा बनवण्यासाठी सर्वप्रथम, कढई गरम करून त्यात साबुदाणे टाका आणि व्यवस्थित लालसर परतून घ्या. त्यानंतर साबुदाणे थंड होण्यासाठी ठेवा.

मिक्सरच्या भांड्यात साबुदाणे टाकून बारीक पावडर तयार करून घ्या. यामुळे पराठ्याचे पीठ मऊ होईल.

मोठ्या वाटीमध्ये मॅश करून घेतलेला बटाटा, हिरव्या मिरचीची पेस्ट आणि जिरं टाकून व्यवस्थित मिक्स आणि नंतर साबुदाण्याचे पीठ टाकून व्यवस्थित मिक्स करा.

तयार केलेल्या मिश्रणात चवीनुसार मीठ टाकून व्यवस्थित मळून घ्या. तयार केलेले पीठ ५ मिनिटं झाकून ठेवा.

तयार केलेल्या पिठाचे छोटे छोटे गोळे करून पराठा जाडसर लाटून घ्या. गरम तव्यावर पराठा टाकून दोन्ही बाजूने व्यवस्थित भाजा आणि तूप लावा.

पराठा दह्यासोबत किंवा काकडीच्या चटणीसोबत अतिशय सुंदर लागतो. तयार आहे मऊसूत उपवासाचा पराठा.

# पार्टी असो वा संध्याकाळची क्रेव्हिंग; स्टफ्ड चीज गार्लिक ब्रेड तुम्हाला नाराज करणार नाही, नोट करा रेसिपी

स्टफ्ड चीज गार्लिक ब्रेड म्हणजे लसणाने आणि चीजने भरलेला आणि भाजलेला ब्रेड. हे एक लोकप्रिय स्नॅक्स किंवा साइड डिश आहे. आपण आजवर हा पदार्थ बाहेर अनेकदा खाल्ला असेल मात्र तुम्हाला माहिती आहे का? तुम्ही घरीही अगदी सहज आणि झटपट याला तयार करू शकता. गार्लिकचा सुगंध आणि चीजची मसालेदार चव या पदार्थाला आणखीनच बहारदार बनवते. संध्याकाळच्या क्रेव्हिंगसाठी किंवा घरी पार्टी असल्यास स्टार्टर म्हणून सर्व्ह करण्यासाठी हा एक उत्तम पर्याय आहे. तुम्ही मुलांच्या टिफिनसाठीही हा पदार्थ तयार करू शकता. मैद्यापासून तयार केलेल्या ब्रेडमध्ये तुम्ही चिली, चीजचे मिश्रण घालता आणि मग त्याला बेक करता. याची चव तुम्हाला हा पदार्थ पुन्हा पुन्हा बनवण्यास भाग पाडेल. काहीतरी नवीन चवदार बनवून खायचे असेल तर यंदाच्या विकेंडला ही रेसिपी नक्की ट्राय करा. चला जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य: ब्रेड साठी: मैदा – २ कप साखर – १ टेबलस्पून सुकं यीस्ट – १ टेबलस्पून कोमट दूध – ट कप कोमट पाणी – ञ कप मीठ – ट टीस्पून ऑलिव तेल – २ टेबलस्पून स्टफिंग साठी: किसलेलं मोजरेला चीज – १ कप चीज स्लाइस – २–३ (ऐच्छिक) बारीक चिरलेला लसूण – १ टेबलस्पून बारीक चिरलेली कोथिंबीर – २ टेबलस्पून चिल्ली फ्लेक्स – १ टीस्पून मिक्स हर्ब्स (ऑरेगॅनो, थायम, इटालियन सीझनिंग) – १ टीस्पून बटर – २ टेबलस्पून

कृती: गार्लिक ब्रेड बनवण्यासाठी सर्वप्रथम एका बाऊलमध्ये कोमट दूध, साखर आणि यीस्ट घालून १० मिनिटे झाकून ठेवा. मिश्रण फसफसल्यावर यीस्ट ॲक्टिव्ह झालं आहे हे समजते. मैदा, मीठ, यीस्टचं मिश्रण आणि तेल एकत्र करून थोडं थोडं कोमट पाणी घालून मऊ पीठ मळून घ्या. झाकून १ तास ठेवा जेणेकरून पीठ फुलेल. यानंतर एका बाऊलमध्ये किसलेलं चीज, लसूण, कोथिंबीर, चिल्ली फ्लेक्स, आणि मिक्स हर्ब्स एकत्र करा. पीठ फुगल्यानंतर त्याला पुन्हा थोडं मळा. आता त्याची एक जाडसर पोळी लाटून त्यावर चीजचं स्टफिंग पसरवा. अर्ध्या भागावरच ठेवा आणि दुसऱ्या अर्ध्या भागाने झाकून द्या. कडा दाबा. बटरमध्ये लसूण आणि कोथिंबीर मिक्स करून ब्रेडच्या वरती लावा. त्यावर पुन्हा थोडे हर्ब्स शिंपडा.

# पित्ताच्या पिशवीत तयार होत आहे दगड, शौचात दिसेल भयंकर लक्षण; दुर्लक्ष केल्यास थेट ऑपरेशन

पित्ताशयातील खडे म्हणजे काय

पित्ताशयाच्या खड्यांची लक्षणे काय आहेत

पित्ताशयाच्या खड्यांवरील उपाय काय आहेत

पित्ताशयाचे खडे ही केवळ पोटात वेदना किंवा अस्वस्थता निर्माण करणारी किरकोळ समस्या नाही, तर ती एक गंभीर समस्या आहे जी केवळ शस्त्रक्रियेनेच बरी करता येते. क्लिनिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी अँड हेपॅटोलॉजी जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, जगातील सुमारे ६ टक्के लोकसंख्येला पित्ताशयाचे खडे आहेत. पित्ताशयाच्या खड्याची समस्या महिलांमध्ये अधिक सामान्य आहे. चुकीच्या जीवनशैली आणि चुकीच्या खाण्याच्या सवयींमुळे ही समस्या सतत वाढत आहे. चिंताजनक बाब म्हणजे लोक अनेकदा पित्ताशयाच्या खड्यांकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे ती कालांतराने कोणत्याही लक्षणांशिवाय गंभीर बनते. पित्ताशयाच्या खड्यांबद्दल जाणून घेणे आणि त्याची लक्षणे वेळेवर ओळखणे तुम्हाला ते गंभीर होण्यापासून रोखण्यास आणि योग्य उपचार घेण्यास मदत करू शकते. गाझियाबादच्या मणिपाल हॉस्पिटलमधील कन्सल्टंट–जनरल सर्जरी डॉ. हितेंद्र शर्मा पित्ताशयाच्या खड्यांची लक्षणे काय आहेत आणि त्याकडे दुर्लक्ष का करू नये हे सांगतात पित्ताशयातील खडे म्हणजे काय? पित्ताशय हे पोटाच्या उजव्या बाजूला यकृताच्या खाली असते. त्यात पित्त रस जमा होतो, जो लहान आतड्यात जातो आणि पचन प्रक्रियेत मदत करतो. जेव्हा हा पित्त रस कडक होतो आणि पित्ताशयात किंवा पित्त नलिकेत लहान तुकड्यांच्या स्वरूपात जमा होतो तेव्हा त्याला पित्ताशयातील दगड अथवा पित्ताशयातील खडे असे म्हणतात. सर्वात जास्त धोका कोणाला? पित्ताशयाचे खडे कोणालाही होऊ शकतात, परंतु महिला आणि जास्त वजन असलेल्या लोकांमध्ये हा धोका जास्त असतो. वयानुसार हा धोका वाढतो आणि याकडे दुर्लक्ष करणे तुम्हाला त्रासदायक ठरू शकते. कारण हा असा आजार आहे ज्यासाठी तुम्हाला हॉस्पिटलमध्ये ऑपरेशनच करून घ्यावे लागते, त्याशिवाय पित्ताशयातील खडे बाहेर पडू शकत नाहीत. कसा होतो परिणाम? पित्ताशयाच्या खड्यांबाबतची मुख्य समस्या अशी आहे की त्या कालांतराने खूप हळूहळू वाढतात कारण त्यावर पित्त जमा होत राहते. ते इतके मोठेदेखील होऊ शकतात की ते लहान आतड्यात पित्त जाण्यास अडथळा आणतात. जर ते पित्त नलिकेत अडकले तर विविध गुंतागुंत होऊ शकतात. या स्थितीत स्वादुपिंड, यकृत आणि पित्ताशयाच्या कार्यावर परिणाम होतो. यामुळे रक्तप्रवाहात पित्त जळजळ किंवा गळती होऊ शकते, ज्यामुळे हिपॅटायटीस आणि कावीळ सारखे आजार होऊ शकतात. म्हणून, ही स्थिती गंभीर होण्यापासून रोखण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे महत्वाचे आहे. जेव्हा पित्ताशयाचे खडे खूप मोठे होतात आणि दैनंदिन जीवनावर परिणाम करू लागतात, तेव्हा पित्ताशय सामान्यतः कापून टाकावे लागते. ही प्रक्रिया लॅपरोस्कोपच्या मदतीने कोलेसिस्टेक्टोमीद्वारे केली जाते. काय आहेत लक्षणं जास्त घाम येणे, सतत ताप येणे अथवा हृदयाची गती वाढणे, पोटामध्ये सूज येणे अथवा पोट अगदी नरमगरम वाटणे, त्वचा आणि डोळे पिवळे पडणे, लघवीचा रंग गडद होणे, शौच मातीच्या रंगाचे दिसणे ही सर्व पित्ताशयाच्या खड्यांची लक्षणं आहेत आणि तुम्हाला ही लक्षणं जाणवत असतील तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. पित्ताशयात खडे का होतात ? जाणून घ्या कधी ठरते गंभीर? पित्ताशयाचे खडे अडकून अडथळा निर्माण होईपर्यंत कोणतीही लक्षणे दाखवत नाहीत.

# महिलांनो हळदीच्या अतिसेवनाने लिव्हर होईल खराब; लिव्हर जपायचं असेल तर डॉक्टरांनी दिलेला सल्ला आधी वाचा



हळद एक असा मसाला आहे, ज्याचा वापर आहारामध्ये तर होतोच पण अनेक आजारांमध्ये उपचार म्हणूनसुद्धा हळदीचा वापर केला जातो. हळदीमध्ये असणारे करक्यूमिन नावाचे तत्व त्याला पिवळा रंग प्रदान करते आणि हेच तत्व हळदीची सगळ्यात मोठी ताकदसुद्धा आहे. हळदीचा वापर आयुर्वेदिक उपचार पद्धतीमध्ये अगदी जुन्या काळापासून केला जात आहे आणि आजसुद्धा भारतातील कित्येक घरांमध्ये विविध उपायांसाठी हळदीचा वापर केला जातो. हळदीचे एवढे सारे लाभ नक्कीच आहेत, पण तुम्हालासुद्धा माहीत आहे की प्रत्येक गोष्टीच्या दोन बाजू असतात; एक चांगली आणि एक वाईट बाजू! हळदीचीसुद्धा एक वाईट बाजू आहे. तुम्ही एका मर्यादित प्रमाणात उपयोग केला तर नक्कीच हळद ही लाभदायक आहे, पण अति प्रमाणात वापर केला तर त्याचे तोटेसुद्धा तुम्हाला भोगावे लागू शकतातच. सध्या समोर आलेल्या एका प्रकरणात, अमेरिकेतील एका ५७ वर्षीय महिलेला यकृतातील एंजाइम सामान्य पातळीपेक्षा ७० पट जास्त असल्याने रुग्णालयात दाखल करावे लागले. इन्स्टाग्रामवर एका डॉक्टरने जळजळ आणि सांधेदुखी कमी करण्यासाठी हळदीच्या फायद्यांबद्दल सांगितल्यानंतर मार्चमध्ये तिने दररोज हळदीच्या गोळ्या घेण्यास सुरुवात केली. परंतु, काही आठवड्यांतच तिला पोटदुखी, मळमळ आणि थकवा जाणवत असल्याचे दिसून आले. एनबीसीच्या एका वृत्तानुसार तिने सांगितले की, दररोज भरपूर पाणी पिऊनही तिच्या लघवीचा रंग गडद होत चालला होता. तिच्या डॉक्टरांनी एनबीसीला सांगितले की, तिचे यकृत पूर्णपणे खराब होण्याच्या काही पावलंच ती दर होती. जर हळद जास्त प्रमाणात घेतली तर ती यकृतावर परिणाम करू शकते. प्रत्येक व्यक्तीची पचनशक्ती वेगळी असते, काही जण हळद जास्त प्रमाणात शोषून घेतात. म्हणूनच हळदीचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. फरीदाबाद येथील मरेंगो एशिया हॉस्पिटल्सच्या इन्स्टिट्यूट ऑफ लिव्हर ट्रान्सप्लांट अँड एचपीबी सर्जरीचे प्रोग्राम क्लिनिकल डायरेक्टर डॉ. पुनित सिंगला यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. सामान्य प्रौढ व्यक्तीसाठी दररोज ५०० ते २००० मिलीग्राम कर्क्युमिन हे पूरक स्वरूपात सुरक्षित आहे. मात्र, डॉक्टरांनी ते लिहून दिल्याशिवाय घेऊ नका. कॅप्सूल स्वरूपात हळदीचे पूरक फक्त कर्क्युमिन अर्क असतात, जे हळदीला त्याचा रंग देणारे संयुग असते, म्हणून यामध्ये कर्क्युमिनचे प्रमाण तुम्हाला हळदीच्या सामान्य सर्व्हिंगमध्ये मिळणाऱ्या प्रमाणापेक्षा खूपच जास्त असते. सप्लिमेंट्स कुणी घेऊ नये? फॅटी लिव्हर, अल्कोहोलिक लिव्हरचा त्रास किंवा काही यकृताचे आजार असलेल्यांनी या सप्लिमेंट्स घेऊ नये, अन्यथा त्यांना त्रास होऊ शकतो, हे २०२३ मध्ये झालेल्या अभ्यासात सिद्ध झाले आहे. जर हळद काळी मिरीसोबत घेतली तर ती त्याचे शोषण वाढवते. जर योगायोगाने तुम्ही असे करत असाल तर एकदा तुमच्या यकृताची तपासणी करा. जर तुम्हाला याचे सेवन केल्यानंतर तुमची लघवी पिवळी पडताना दिसली किंवा अशक्तपणा, पोटात जडपणा आणि थकवा जाणवत असेल तर एकदा यकृताच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. आपण आपल्या रोजच्या जेवणात जितकी हळद घालतो ती पुरेशी आहे

, जास्त हळदीच्या सेवनाची गरज नाही.

कोणत्या लक्षणांकडे लक्ष द्यावे?

जर हळदीचे जास्त प्रमाणात सेवन केले तर तुमच्या लघवीचा रंग पिवळा होऊ शकतो. तुम्हाला सुस्ती, पोटात जडपणा, अशक्तपणा आणि जठरांच्या समस्या जाणवू शकतात. ही यकृताच्या ताणाची किंवा नुकसानाची सुरुवातीची लक्षणे असू शकतात. जर ही लक्षणे आढळली तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि यकृताच्या कार्याची चाचणी घ्यावी.

# तुम्ही काळा भात कधी खाल्ला आहे का? वाचा, तज्ज्ञांनी सांगितलेले 'कालाबाती' काळ्या तांदळाचे पौष्टिक फायदे

शरीराला आवश्यक असलेले पोषण न मिळाल्याने शारीरिक आणि मानसिक वाढ खुंटते, ज्यामुळे कुपोषणाचा सामना करावा लागतो. या कुपोषणाचा सामना करण्यासाठी कालाबाती नावाचा काळा तांदूळ फायदेशीर ठरू शकतो. आवश्यक पोषक तत्त्वे, व्हिटॅमिन्सयुक्त कालाबाती तांदूळ अतिशय पौष्टिक मानला जातो, जो लहान मुलांना कुपोषणापासून दूर ठेवण्यास मदत करतो. संबलपूर विद्यापीठाच्या फूड सायन्स टेक्नोलॉजी अँड न्युट्रिशन विभागातील पीएचडी स्कॉलर पायल शर्मा यांनी अलीकडेच केलेल्या एका संशोधनातून असे समोर आले की, कालाबाती काळा तांदूळ फायदेशीर आहे. त्यांनी संशोधन करताना उंदरांना पोषक मिश्रण खायला दिले आणि त्याचे सकारात्मक परिणाम दिसले. संशोधनात वापरलेल्या एकत्रित न्युट्रिशन पदार्थांना 'न्युट्री नेस्ट' असे नाव देण्यात आले आणि कालाबाती काळा तांदूळ या 'न्युट्री नेस्ट'चा प्रमुख घटक होता. त्यात शेंगदाणे, नाचणी, सोयाबीन, गूळ आणि दुधाच्या पावडरचासुद्धा समावेश होता. पायल शर्मा सांगतात, निरीक्षणानंतर आम्हाला असे दिसून आले की, 'न्युट्री नेस्ट' देण्यात आलेले उंदीर इतर गटांतील उंदरांपेक्षा जास्त तंदुरुस्त आणि वजन वाढलेले दिसले. पण, आम्ही आतापर्यंत माणसांवर ही चाचणी केलेली नाही. डेक्कन क्रॉनिकलच्या मते, शर्मा यांच्या एका वर्षाच्या अभ्यासातून असे उघड झाले आहे की, कालाबाती काळा तांदूळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. त्यातील पौष्टिकतेमुळे आणि विशेषतः लहान मुलांमध्ये आढळणाऱ्या कुपोषणाचा सामना करण्यासाठी हा तांदूळ अत्यंत महत्त्वाचा आहे.

शौचासोबत रक्त आलं तर मुळव्याध नाही होऊ शकतो कॅन्सर, शरीरातील 'या' ५ लक्षणांकडे अजिबात दुर्लक्ष करू नका, नाहीतर

फिल्मफेअर मराठी पुरस्कार सोहळ्यासाठी मिताली मयेकरचा साडीच्या गाऊनमधील सुंदर लूक

जनसुरक्षा विधेयक न वाचताच विरोध; मुख्यमंत्री फडणवीस यांची उद्धव ठाकरेंवर नाव न घेता टीका

ओडिशा टीव्हीने दिलेल्या माहितीनुसार, संशोधकांना आशा आहे की या तांदळाच्या शोधाचे पेटंट मिळेल आणि लवकरच बाजारात हा काळा तांदूळ उपलब्ध होईल.

कालाबती काळा तांदूळ इतर तांदळापेक्षा वेगळा कसा आहे आणि आपल्या दैनंदिन आहारात त्याचा समावेश केला जाऊ शकतो का? द इंडियन एक्स्प्रेसनी आहारतज्ज्ञ कनिक्का मल्होत्रा यांच्या हवाल्याने याविषयी सविस्तर माहिती सांगितली आहे. कनिक्का मल्होत्रा सांगतात, कालाबाती काळ्या तांदळाची रचना त्याला इतर तांदळापेक्षा वेगळे ठरवते, ज्यामुळे तो अधिक पौष्टिक असतो. या तांदळामध्ये असलेले चांगले अँटिऑक्सिडंट्स घटक त्याच्या गडद रंगाद्वारे दिसतात, जे अँथोसायनिन रंगद्रव्यांपासून निर्माण होतात. हे रंगद्रव्य पचनासाठी फायदेशीर असतात, साखर नियंत्रित ठेवण्यास मदत करतात आणि दीर्घकालीन आजारांचा धोका कमी करण्यास मदत करतात. संतुलित आणि निरोगी आहार घेण्याचा विचार करत असाल तर कालाबाती काळा तांदूळ हा एक उत्तम पर्याय आहे, कारण त्यात फायबर, अँटिऑक्सिडंट्स याशिवाय लोह, प्रोटिन्स आणि व्हिटॅमिन बीसारख्या प्रमुख मिनरल्सचा चांगला स्त्रोत आहे, असे मल्होत्रा सांगतात.

# आदर्श विद्यालयात विद्यार्थी संसद निवडणूक उत्साहात संपन्न



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बनसारोळा येथे दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यार्थी संसद निवडणूक मोठ्या उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध खात्यांसाठी मंत्री निवड करण्यात आले. या निवडणुकीत विद्यार्थी प्रतिनिधी प्रतीक महादेव पौळ वर्ग १२ वी विज्ञान आणि संकेत मनोज पांचाळ वर्ग दहावी अ, आरोग्य मंत्री राधिका किरण बोरगे वर्ग नववी ब, अक्षरा गुणवंत गायकवाड वर्ग नववी अ, स्वच्छता मंत्री काकडे तेजस्विनी शुकलेश्वर काकडे वर्ग आठवी ब , क्रीडा मंत्री आर्यन विठ्ठल काकडे वर्ग आठवी ब संगमेश्वर मारुती शिंदे वर्ग नववी ब , शालेय शिस्त मंत्री हर्षवर्धन श्रीपाद गोरे वर्ग सातवी अ अधिराज ज्ञानेश्वर रोकडे वर्ग सातवी अ, वृक्षारोपण मंत्री गणेश सतीश पौळ वर्ग बारावी कला, प्रतीक महादेव पौळ वर्ग बारावी विज्ञान, सांस्कृतिक मंत्री श्रद्धा अनिल जोगदंड वर्ग आठवी अ, राधा गणेश करंजकर वर्ग बारावी विज्ञान आणि विद्या मंत्री अक्षरा अमोल गोरे वर्ग दहावी अ, संकेत मनोज पांचाळ वर्ग दहावी अ अशी विविध पदे विद्यार्थ्यांमध्ये वाटप करण्यात आली. सर्व पदाधिकारी विद्यार्थ्यांची निवड निवडणूक प्रक्रियेद्वारे करण्यात आली. या उपक्रमात मुख्याध्यापक सौ. सिंधुताई चव्हाण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सांस्कृतिक विभागप्रमुख श्री. संतोष रोकडे व श्री. शिवाजी मांदळे यांनी नियोजनाची जबाबदारी पार पाडली. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव आणि लोकशाही मूल्ये रुजविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरला.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी.




केज/प्रतिनिधी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सुदाम सरवदे, उपाध्यक्षा सीमा सुधीर मोहिते, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.क्रांतिसिंह नाना पाटील यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील बहे या गावी आजोळी दि.३ ऑगस्ट १९०० रोजी झाला.त्यांचे मुळ गाव येडेमच्छिंद्र आहे.वडिलांचे रामचंद्र पाटील व आईचे नाव लक्ष्मीबाई होते.ते भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सैनिक आणि स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी राजकारणी होते.त्यांनी अंधश्रद्धा,हुंडा पद्धत या अनिष्ट प्रथा व चालीरीती बाबत जनजागृती केली.ब्रिटिशांच्या अन्यायी राजवटीस आव्हान देऊन क्रांतिकारक मार्गाचा पुरस्कार केला.जबरीने सारा वसूल करणारास पायावर काठीने मारत व पत्रेही ठोकण्यात येत. त्यांची ग्रामराज्य स्थापन करण्याची कल्पना होती.ते काँग्रेस पक्ष सोडून कम्युनिस्ट पक्षात जाऊन दोन वेळा लोकसभेवर निवडून आले व खासदार झाले.ते बीड लोकसभा मतदारसंघात १९६७ मध्ये निवडुन आले.त्यांना प्रती सरकार किंवा पत्री सरकार म्हणुन ओळखले जात असत.असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले.श्री बाळासाहेब भिल्लु राठोड सर यांनी सविस्तर माहिती दिली.श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम, श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम, ट्रेनी शिक्षिका सीमा सुधीर मोहिते मॅडम, शिक्षक श्री भारत बाबुराव हांगे सर, श्री बाबासाहेब राजाराम मैंद सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ.७ वी ची श्वेता सुहास सरवदे यांनी केले.आभार भाग्यश्री ओमप्रकाश मोहिते यांनी मानले व कार्यक्रम संपन्न झाला.

# अखेर प्रशांत निमसरकर व पवन कुळसंगे मित्रपरिवार यांच्या संघर्षाला यश पांढरकवडा ते पाटण बस सेवा सुरु-चालक व वाहकाचे स्वागत



यवतमाळ/ प्रतिनिधी :- झरीजामणी:ग्रामस्थांची दीर्घकालीन मागणी आणि मागील काही महिन्यांपासून चालू असलेल्या पाठपुराव्याला अखेर यश लाभले आहे. माननीय लोकप्रिय आमदार संजयभाऊ देरकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशांत प्रकाश निमसरकर व पवन खुशाल कुळसंगे मित्रपरिवार यांनी सातत्याने प्रशासनाकडे केलेले निवेदन, चर्चासत्र आणि पाठपुराव्याचे फलित म्हणून पांढरकवडा ते पाटण बस सेवा काल दि.५ ऑगस्ट २०२५ पासून सुरु करण्यात आली आहे. या सेवेचा लाभ शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना होणार आहे. यामुळे पाटण गावाचा संपर्क मुख्य शहराशी सुकर होणार असून आर्थिक व सामाजिक विकासालाही चालना मिळेल. प्रशांतभाऊ व पवनभाऊंच्या प्रयत्नामुळे आम्हाला प्रवासाचा हक्क मिळाला आहे. ही सेवा आमच्यासाठी वरदान ठरणार आहे. अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली. ग्रामस्थांनी या उपक्रमासाठी प्रशांत निमसरकर, पवन कुळसंगे व त्यांच्या मित्रपरिवाराचे मन:पूर्वक आभार मानत पुढील काळातही अशा विकासाभिमुख उपक्रमांतून त्यांनी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. पांढरकवडा-पाटण ही बस येताच सतपल्ली येथे चालक व वाहक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी बापुरावजी लक्षट्टीवार, तंटामुक्त अध्यक्ष गोवर्धन मेंगावार, दत्ता मेडपटलावार, राजुभाऊ लक्षट्टीवार, अनिल मोहजे, प्रशांत निमसरकर, पवन कुळसंगे, दत्ताभाऊ परचाके व प्रशांत निमसरकर मित्रपरिवार सतपल्ली हे उपस्थित होते.

# शहरात धोकादायक पद्धतीने उभारण्यात आलेले व अर्धवट काम करून सोडून दिलेले युनिपोल कामाची चौकशी करून दोषी अधिकारी/ गुत्तेदारावर कायदेशीर कार्यवाही करण्याची समितीचे मागणी

जाहिराती फलक लावण्याकरिता लातूर शहरात विविध ठिकाणी , दुभाजकात धोकादायक पद्धतीने उभारण्यात आलेले व अर्धवट काम करून सोडून दिलेले युनिपोल मूळे राजश्री छत्रपती शाहू महाराज चौकात दिनांक १ ऑगष्ट च्या रात्री युनिपोल च्या उघड्या सळाईवर दुचाकी आदळून युवकाचा अपघाती मृत्यू झाला असून सदरची बाब गांभीर्याने घेऊन युनिपोल कामाची चौकशी करून कामाची तपासणी अंती परवानगी देणाऱ्या दोषी महानगरपालिका अधिकारी व गुत्तेदारावर कायदेशीर कार्यवाही करण्याच्या मागणीचे निवेदन लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने आयुका कडे करण्यात आले आहे निवेदनात घाटकोपर येथिल घटनेच्या धर्तीवर लातूर शहरात उभारण्यात आलेल्या युनिपोलच्या बाबतीत अक्षम्य दुर्लक्ष करणाऱ्या लातूर शहरमहानगर पालिका विभागाचे अधिकाऱ्यांविरोधात /कंत्राटदार यांचेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली निवेदनावर समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे , सचिव बाबासाहेब बनसोडे,भगवेश्वर धनगर इत्यादीच्या स्वाक्षऱ्या आहेत

# केज पोलीसांच्या डोळ्यावर पडदा अवैध वाहतूक दिसत नाही फक्त ट्राफिकच्या नावाखाली सर्वसामान्य जनतेला मात्र त्रास

## केज पोलिसांच्या नाकावर टिच्चून होतेय अवैध वाहतूक



केज !प्रतिनिधी केज शहरातील मुख्य रस्त्यावरील शिवाजी महाराज चौकात भर दिवसा पोलिसांच्या नाकावर टिच्चून अवैध वाहतूक करणाऱ्या गाड्या मात्र पोलिसांच्या निर्दर्शनास येत नाहीत फक्त टू व्हीलर व सर्वसामान्य लोकांच्या गाड्या काढण्यासाठी पोलिसांची अरेरावी करताना केज शहरात दिसून येत आहे मात्र केज पोलीसांनी शहरातील ट्राफिक कमी करण्याऐवजी ट्राफिक पोलिसांच्या समोर अवैध वाहतूक होत असताना यांच्या निदर्शनास येत नाही का? यावरून असे दिसून येते की केज पोलिसांच्या डोळ्यावर पडदा आला की,काय? केज शहरात अनेक अवैध धंदे सुरू असताना पोलीस प्रशासन मात्र मूग गिळून गप्प का ? आसे ऐकवण्यास मिळत आहेत यामध्ये वारंवार तक्रारी करूनही पोलीस प्रशासन मटका ,गुटका, व अवैध वाहतूक यांना पाठीशी घालत आहे अशा जनतेतून प्रतिक्रिया ऐकवण्यास मिळत आहे व केज शहरातील रहदारीचे ठिकाण छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये ट्राफिक सतत मोठ्या प्रमाणात असते परंतु ट्राफिकला आळा घालण्यासाठी अवैध्य वाहतूक तहसील समोरील पोलिसांच्या निर्दर्शनास का येत नाही , केज पोलिसांच्या कृपा आशीर्वादाने केज मध्ये खुले आम अवैध वाहतूक, मटका तर केज पंचायत समितीच्या आवारात पोलिस स्टेशन च्या हाकेच्या अंतरावर सर्रास सुरू असु देखील पोलिस गप्प का? एखाद्या सर्व सामान्या नागरिकांनी अवैधरित्या चालत असलेल्या धंद्याच्या विरोधात आवाज उठवला तर अवैध धंदे करणारे अरेरावी करातात वेळप्रसंगी हंबरातुंबरी पण करतात परंतु केज येथिल पोलिस यंत्रणा मुग गिळुन गप का? असा सवाल जनतेतून विचारला जात आहे. केज शहरातील बीट अंमलदार नावापुरतेच आहेत की,काय? त्यांना शहरात चालू असलेल्या अवैध धंद्याची माहिती असून त्यांचेच लागेबांधे, विविध धंद्यावाली सोबत आहेत की,काय? असा आरोप जनसामान्यातून केला जात आहे.

# खरा भारतीय कोण आहे हे ; सर्वोच्च न्यायालयाच्या टिप्पणीवर प्रियंका गांधींचे भाष्य



संसदेत पावसाळी अधिवेशन सुरू आहे. काँग्रेससह संपूर्ण विरोधी पक्ष अनेक मुद्द्यांवर मोदी सरकारवर हल्लाबोल करत आहे. दरम्यान, आज सर्वोच्च न्यायालयाच्या टिप्पणीबाबत काँग्रेसच्या सरचिटणीस आणि खासदार प्रियांका गांधी वड्रा यांनी एक विधान केले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावरील सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या टिप्पणीवर प्रतिक्रिया देताना काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी म्हणाल्या, माननीय न्यायाधीशांचा पूर्ण आदर करून, मी हे सांगू इच्छिते की ते खरे भारतीय कोण आहे? कोण नाही हे न्यायालय ठरवत नाहीत. विरोधी पक्षनेत्याचे काम आहे, सरकारला आव्हान देण्यासाठी प्रश्न विचारणे हे त्यांचे कर्तव्य आहे.असे त्या म्हणाल्या आहेत.केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रियांका गांधी म्हणाल्या की, माझा भाऊ (राहुल गांधी) कधीही सैन्याविरुद्ध काहीही बोलणार नाही. तो सैन्याचा खूप आदर करतो. त्यामुळे, हा चुकीचा अर्थ लावला जातो.असे म्हणत त्यांनी सर्वोच्च न्यायालयांच्या टिपणीवर भाष्य केले आहे.संपूर्ण प्रकरण काय आहे? भारत आणि चीनच्या सैन्यांमधील संघर्षाबाबत राहुल गांधी यांच्या विधानांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या प्रकरणात कनिष्ठ न्यायालयाने समन्स बजावले होते. यासोबतच राहुल गांधी यांनी इतर प्रलंबित प्रकरणांबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.' तुम्ही सर्व सोशल मीडियावर का लिहितात?' सुनावणीदरम्यान, देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींना अतिशय कठोर स्वरात प्रश्न विचारला. त्यांना विचारण्यात आले की तुम्हाला कसे कळले की चीनने भारताच्या भूमीवर कब्जा केला आहे. तुम्ही कोणत्याही पुराव्याशिवाय असे विधान का केले? जर तुम्ही खरे भारतीय असाल तर तुम्ही असे बोलणार नाही. न्यायालयाने राहुल यांना संसदेत असे मुद्दे उपस्थित करण्यास सांगितले आणि विचारले की ते हे सर्व सोशल मीडियावर का लिहितात?

# काँग्रेसचे नूतन जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांचा सत्कार



लातूर :- लातूर जिल्हा काँग्रेसचे नूतन अध्यक्ष अभय (दादा) साळुंखे यांची लातूर जिल्हा अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा गायकवाड पवनकुमार व त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी माजी उपमहापौर. कैलासजी कांबळे, माजी नगरसेवक. इम्रानभाई सय्यद, जनएकता संघटनेचे सं. अध्यक्ष. इरफान भाई शेख, फारुख शेख, अफान शेख यांची उपस्थिती होती....!

# रशियाच्या ड्रोनचे भारताशी कनेक्शन ; डोनाल्ड ट्रम्पनंतर युक्रेनचे गंभीर आरोप



रशिया आणि युक्रेनमधील तणाव अजूनही संपलेला नाही. दरम्यान, एक नवीन प्रकरण समोर आले आहे. एका इंग्रजी वर्तमानपत्राच्या वृत्तानुसार, युक्रेनने भारताबद्दल एक मोठा दावा केला आहे. रशिया आपल्या ड्रोनमध्ये भारतात बनवलेले इलेक्ट्रॉनिक भाग वापरत आहे. तसेच युक्रेनवर हल्ला करण्यासाठी हे ड्रोन वापरले जात आहेत असे म्हटले आहे.

युक्रेनियन अधिकाऱ्यांनी हे प्रकरण भारत सरकार आणि युरोपियन युनियनसमोर ठेवले आहे. समोर आलेल्या वृत्तानुसार, इराणच्या ड्रोन शाहिद-१३६ मध्ये वापरलेले भाग भारतीय कंपन्यांनी बनवले आहेत. युक्रेनियन सरकारने परराष्ट्र मंत्रालयासमोर याविरोधात निषेध नोंदवला आहे.

शाहिद १३६ हा एक स्वस्त आणि प्राणघातक ड्रोन आहे, जो रशियासाठी गेम-चेंजर ठरला आहे. युक्रेनचा दावा आहे की केवळ जुलै महिन्यात असे ६,१०० हून अधिक ड्रोन लाँच करण्यात आले.

ड्रोनचे कोणते भाग भारतात बनवल्याचा दावा ? ड्रोनमध्ये बसवलेले व्होल्टेज रेग्युलेटर भारतात बनवले आहे असा दावा करण्यात आला आहे. ते विश्व इंटरटेक्नॉलॉजीने असेंबल केले आहे.

# आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यासह गुत्तेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा-भगवंत वायबसे

केज/प्रतिनिधी आवादा कंपनीचे अधिकारी सतीशकुमार शर्मा, सागर चंद्रकांत साबळे, संदीप खेत्रे, सुनील शिंदे व गुत्तेदार अमोल पाटील यांच्यावर सदोष मनुष्यवदाचा (आयपीसी ३०२) सध्याच्या कायद्याप्रमाणे बी.एन. एस.१०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी उपजिल्हाधिकारी, आंबेजोगाई यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) मराठवाडा कार्याध्यक्ष भगवंत वायबसे यांनी केली आहे. दिं.२४ जुलै २०२५ रोजी पासून शेतकरी भोसले, तेलंग, थोरात यांच्यासह इतर शेतकरी हे आवादा कंपनीच्या अधिकारी यांच्या दादागिरी व मनमानी कारभाराविरोधात आमरण उपोषणास तहसील कार्यालय, केज येथे बसले होते. दिनांक २५ जुलै २०२५ रोजी सुभाबाई गोपाळ भोसले यांना व कुटुंबाला होत असलेल्या मानसिक, शारीरिक त्रास सहन न झाल्याने त्यांची तब्येत अचानक खालावली त्यानंतर सुभाबाई भोसले यांना उपोषण स्थळावरून तात्काळ डॉ. अस्वले यांचे विघ्नहर्ता हॉस्पिटल मध्ये दाखल केले असता त्यांना डॉक्टरांनी मयत घोषित केले. सुभाबाई गोपाळ भोसले यांच्या मृत्यूस जबाबदार असणारे आवादा कंपनीचे अधिकारी सतीशकुमार शर्मा, सागर चंद्रकांत साबळे, संदीप खेत्रे, सुनील शिंदे व गुत्तेदार अमोल पाटील यांच्यावर सदस मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा या मागणीचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने देण्यात आलेले आहे. आवादा कंपनीचे काही अधिकारी स्वतःच्या व्यक्तिगत फायद्यासाठी असंविधानिक पद्धतीने कायदा व सुव्यवस्थेचा भंग करत स्थानिकचे काही गाव गुंड यांना सोबत घेऊन शेतकरी बांधवांना व भगिनींना दमदाटी करून जबरदस्तीने, पोलीस प्रशासनामधील काही पोलीस अधिकारी यांच्या मदतीने दबाव तंत्र वापरून शेतकऱ्यांच्या राजे मर्जीच्या विरोधात जाऊन जबरदस्तीने जमिनी बळकवण्याचे काम राजरोसपणे सुरू आहे. संबंधितावर कोणाचाही अंकुश नाही तथापि पीडित भोसले कुटुंब संविधानिकरीत्या आपली मागणी तहसील कार्यालय समोर आमरण उपोषणाच्या माध्यमातून न्याय मागण्यासाठी दिनांक २४जुलै २०२५ रोजी उपोषणास बसले होते. दिनांक २५ जुलै २०२५ रोजी सकाळी नऊ ते साडेनऊच्या सुमारास कुटुंबाला भेटण्यासाठी मयत सुभाबाई गोपाळ भोसले या उपोषण स्थळी आल्या व कुटुंबासोबत बसल्या आपल्या कुटुंबाची होत असलेली हेळसांड, मानसिक त्रास, जमीन आपलीच असून आपल्याच मुलांना व नातवांना पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून वरील नमूद अधिकारी यांनी दिनांक सात ०७ एप्रिल २०२५ रोजी केज पोलीस ठाणे येथे एन सी आर क्र.२५९/२०२५ कलम ११५(२),३५२,३५१(२),३५१(३),३(५), वी.एन.एस.अन्वये अदाखलपात्र गुन्हे दाखल केले. या सर्व गोष्टी त्यांच्यासमोर अचानक उभ्या राहिल्या आणि आत्ता आपली जमीन जाणार या भीतीपोटी त्यांची तब्येत अचानकपणे खालावली त्यांना मानसिक व शारीरिक त्रास सहन झाल्याने त्यांची तब्येत अचानक खालवली व त्यांना उपोषण स्थळावरून तात्काळ डॉ. असोले यांच्या विघ्नहर्ता हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले. सुभाबाई भोसले यांच्या मृत्यूस जबाबदार असणारे सर्व अवदा कंपनीचे अधिकारी सतीशकुमार शर्मा, सागर चंद्रकांत साबळे, संदीप खेत्रे, सुनील शिंदे व गुत्तेदार अमोल पाटील यांच्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करून पीडित कुटुंबास न्याय देण्यात यावा असे लेखी दिलेल्या निवेदनात रिपब्लिकन पार्टीचे मराठवाडा कार्याध्यक्ष भगवंत वायबसे यांनी म्हटले आहे. जर पीडित कुटुंबाला संविधानिक रित्या न्याय मिळाला नाही तर पक्षाच्या वतीने भव्य आंदोलन उभा केले जाईल असा प्रशासनाला इशारा दिला आहे. मागणीचे लेखी निवेदन उपजिल्हाधिकारी आंबेजोगाई, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड, जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड यांना देण्यात आले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE